*कष्टकरी जनता, भूषण भारता । वंदन करितो पददलिता ।।*

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक**

संपादक
**रामचंद्र मुटाटकर**

# हाकारा (त्रैमासिक)

कार्यकारी संपादक
**ग. शां. पंडित**

**वर्ष : ३० वे** | **एप्रिल-जून २००९** | **अंक : दुसरा**

## अनुक्रमणिका

संपादकीय ........ २

१. आदिवासी की वनवासी ? : प्रा. डॉ. मोतीराम रावजी देशमुख ........ ३

२. भारतीय आदिवासी आणि जागतिकीकरण : धनाजी पाटील, श्रीकांत राठोड ........ ५

३. आदिवासी साहित्य-भाषा व शैली : विरसिंग पाडवी, नंदूरबार ........ ९

४. मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या स्थलांतराचा अभ्यास : प्रा. डॉ. जयवंत इंगळे, सांगली ..... १३

५. आदिवासी दलितांसारखा लढाऊ का नाही ? : प्रा. डॉ. मोतीराम रावजी देशमुख ........ २५

६. कर्मवीर दादासाहेब यांच्या सहवासातील एक तप : ना. सी. पाटील, नाशिक ........ २८

७. ग्रामीण विकासात जात पंचायतीची भूमिका : प्रा. साधना बी. जावळ ........ ३१

८. छायाताई सुरतवंती, अंबरसिंग महाराजांच्या धर्मपत्नी : वाहरु सोनवणे ........ ३३

९. विज्ञान वाहिनीची फिरती प्रयोगशाळा : श्री. सुधीर जोग, पेण ........ ३५

१०. ‘देवबाग’ मधील समाज जीवन ........ ३७

११. गाबितांचे जीवनचक्र ........ ४३

◆ **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
टेलिफॅक्स (०२०)२५८९७२९८

◆ **अक्षर जुळणी**
नंदू हि. दिघे

◆ **मुद्रण स्थळ**
ओम एंटरप्राईजेस, पुणे


◆ **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

◆ **मुखपृष्ठ छायाचित्र**
आदिवासी उत्थान कार्यक्रमाच्या
कार्यक्षेत्रातील छायाचित्रे

**अंक मूल्य ४०/- रूपये**

**या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या
लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.



# संपादकीय

'हाकारा'चा ३० व्या वर्षातला हा दुसरा अंक केवळ एका विषयाला वाहिलेला नाही. विशेषांकाच्या परंपरेत हा अंक बसत नसला तरी आदिवासी जीवनाशी निगडीत समस्या व संस्कृतीचे दर्शन घडविणारा आहे.

प्रा. मोतीराम देशमुख यांनी आपल्या दोन लेखांत आदिवासी अस्मितेचा व अस्तित्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. 'आदिवासी' या शब्दातच 'आदी' म्हणजे मूळ निवासी असा अर्थ प्रतीत होत असताना केवळ रानावनात, डोंगरदऱ्यांत राहतात, म्हणून या मूळ निवासींना 'रानटी, जंगली, वनवासी' असे संबोधले जाते. म्हणजे इथला प्रस्थापित समाज त्यांना आपल्यापासून वेगळे समजतो, असा (गैर) समज निर्माण केला जात आहे. एकसंघ समाज या संकल्पनेला हे घातक ठरणारे आहे.

दलितांमध्ये त्यांचे समाजातून नेतृत्व उदयाला आले, त्यामुळे सततच्या संघर्षातून त्यांच्यात लढवय्ये पण निर्माण झाले. आदिवासींमध्ये असे नेतृत्व उदयाला आले नाही. पण याच आदिवासींचे देशाच्या स्वतंत्रतेमध्ये मोलाचे योगदान आहे, हे विसरुन चालणार नाही.

आदिवासींमध्ये एकीकडे आज शिक्षणाच्या माध्यमातून विकासाची दिशा सापडू लागली असताना जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मात्र दुसरीकडे याच आदिवासींच्या जीवनावर, शिक्षणावर, संस्कृतीवर त्याचे घातक परिणाम होताना दिसताहेत. त्यांच्या अस्तित्त्वालाच त्यातून धोका निर्माण झाला आहे. याची जाणीव धनाजी पाटील व श्रीकांत राठोड यांच्या लेखातून आपल्याला होते.

प्रा. जयवंत इंगळे यांनी 'मोखाडा' या कुपोषणाच्या बाबतीत बहुचर्चित असलेल्या तालुक्याचा अभ्यास करुन तिथे होणाऱ्या स्थलांतराचे आदिवासींच्या आरोग्यावर, राहणीमानावर कोणते परिणाम होताहेत, याची माहिती करुन दिली आहे. तर वीरसिंग पाडवी यांनी आदिवासी समाजाच्या संस्कृती-परंपरेचे दुसरे अंग असणाऱ्या साहित्यामुळे त्यांची संस्कृती कशी टिकून आहे, हे सांगितले आहे.

डांग सेवा मंडळाचे आदरणीय दादासाहेब बीडकर यांच्या सेवाव्रती जीवनाचे धागेदोरे मा. ना. सी. पाटील सरांनी आपल्या लेखातून उलगडून दाखविले आहेत. त्यांच्या या आठवणींची शृंखला पुढील अंकातही गुंफलेली दिसेल.

आदिवासी कवी वाहरू सोनवणे यांनी छायाताईंना वाहिलेल्या श्रध्दांजलीतून छायाताईंच्या सामाजिक जीवनाचे दर्शन आपल्याला होते.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण जवळील एका बेटवजा ठिकाणी 'देवबाग' नामक गाव आहे. 'गाबीत' या बहुसंख्य असलेल्या समाजाचा अभ्यास पुणे विद्यापीठातील मानवशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी केला. त्या माहितीवर आधारीत दोन लेख या अंकात प्रसिध्द केले आहेत.

हाकारात प्रसिद्ध झालेले साहित्य अभ्यासपूर्ण व माहितीवर असल्याने ते अभ्यासक व जिज्ञासूंना उपयुक्त ठरणारेच असते. या अंकातील लेखांबाबत वाचकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

ग. शां. पंडित
कार्यकारी संपादक

# आदिवासी की वनवासी ?

**प्रा. डॉ. मोतीराम रावजी देशमुख**

भारतातील आदिवासी जनसमूह भूमीज, आदिम, वनवासी, आदिवासी इत्यादी वेगवेगळ्या नावांनी ओळखले जातात. भारतीय राज्यघटनेत त्यांचा उल्लेख अनुसूचित जमाती असा करण्यात आलेला आहे. रामायण, महाभारत आणि पुरातन संस्कृत साहित्यात यांचा वेगवेगळ्या नावाने उल्लेख आलेला आहे. साधारणत: रामायण, महाभारत काळ चार–पाच हजार वर्षांपूर्वीचा असावा. आर्य भारतात येण्यापूर्वी येथे लहान–मोठ्या टोळ्यांनी आदिवासी समाज राहात होता.

आदिवासी साहित्याचे अभ्यासक, संशोधक डॉ. गोविंद गारे यांचे याबाबतचे मत बोलके आहे. ते म्हणतात ‘‘आदिवासी हे या देशाचे मूळ रहिवाशी आहेत. या भूमीवर त्यांची मोठीमोठी साम्राज्य होती. भारतभूमीचा बहुसंख्य भूभाग आदिवासी राज्यांनी व्यापलेला होता. मध्यभारतात वैभवशाली गोंड राज्य होते. उत्तर व पश्चिम भारतात भिल्लांचे राज्य होते. प्रसिध्द कलिंग देशावरही भिल्लांचेच राज्य होते. उत्तर आणि पूर्व मध्यप्रदेशांत नागा मिझो, संथाल, हूँ, ओराँग या आदिवासींची स्वतंत्र राज्ये होती. सह्याद्री पर्वताच्या सानिध्यात देखील महादेव कोळी आणि कोकणा जमातीची स्वतंत्र राज्ये होती.’’ डॉ. गारे, इतिहासाचार्य राजवाडे, नारगोलकर, डॉ. प्रभाकर मांडे या आणि इतर अभ्यासक, विचारवंताच्या मतांवरुन देशातील हे मूळचे रहिवासी स्वत:ला आदिवासी म्हणून घेणेच अधिक पसंत करतात. डॉ. गारे यांच्या मनात याबाबत अधिक स्पष्टता जाणवते.

जंगल, डोंगरदऱ्यांत राहणारे रानटी, जंगली, अडाणी लोक म्हणजे आदिवासी अशी आदिवासींबद्दल सर्व साधारण लोकांची कल्पना होऊन बसली आहे. वास्तविकत: आदिवासी हेच या देशाचे मूळ रहिवासी आहेत. भारताबाहेरुन आलेल्या सबलांनी सशस्त्र ताकदीच्या जोरावर त्यांचा पराभव केल्यामुळे सुरक्षितता व एकांततेच्या हेतुने नाईलाजास्तव आदिवासींना जंगल, दऱ्याखोऱ्यांचा आश्रय घ्यावा लागला. तेव्हापासून ते जे दूर झाले ते आजवर कायमचेच दूर झाले. इतरांनीही त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. पर्यायाने हजारो वर्षे ते अज्ञानी आणि अशिक्षित राहिले. मात्र तशाही परिस्थितीत त्यांनी आपली मूळ संस्कृती व मूल्ये जपली. प्रामाणिक, निर्मळ अंत:करण आणि हरण्याकाळजाचे हे लोक निसर्गालाच आपले सर्वस्व मानून तेथेच रमले.

जंगलाच्या–वनांच्या आश्रयाने राहणारा आदिवासी समाज हा या देशातील मूळ निवासी आहे. परंतु असे असतानाही काही संस्था, संघटना, राजकीय पक्ष त्यांना जाणीवपूर्वक ‘वनवासी’ संबोधन वापरुन आदिवासी हे आपल्यापेक्षा वेगळे आहेत, असा समज जाणूनबूजुन निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

कलुशीत वातावरण तयार करण्याचा त्यांचा हा प्रयत्न दिसतो. एकसंघ समाजात विभक्तपणा निर्माण करण्यामध्ये त्यांचे काही हितसंबंध गुंतले आहेत. अशांना आदिवासी हे या भूमीचे मूळ रहिवाशी आहेत ही कल्पना कदाचित रुचत नसावी. वास्तविकत: ते या देशाचे मूळ रहिवाशी आहेत, म्हणजेच आदिवासी आहेत. मग या देशाचे मूळ रहिवाशी ते वनवासी कसे बरे असतील ?

त्यांना हा वनवास कोणी दिला ? त्यांना वनवासी संबोधून त्यांच्या श्रेष्ठ परंपरा, मूळ संस्कृती आणि पराक्रमी इतिहास विसरण्यास भाग पाडण्याचाच तर हा डाव नाही ना ? या देशातील विद्येच्या उपासक विद्वानांना हा अडाणी, श्रध्दाळूपणा, प्रामाणिक, कष्टाळू, भोळाभाबडा पराक्रमी आदिवासी कधी दिसलाच नाही, याचेच नवल वाटते. आदिवासींचा खरा वनवास सुरु झाला तो तेथूनच. आदिवासींच्या वाट्याला आलेला हा वनवास कोणत्या पापाचे प्रायश्चित्त म्हणून आला आहे हे न उलगडणारे कोडे आहे. स्वातंत्र्याच्या साठीतही न संपलेला हा वनवास कधी संपेल ते काळच जाणो.

आजही बहुसंख्य आदिवासी समाज अठराविश्व दारिद्र्यात जीवन जगत असला तरी तो कष्टाळू आणि स्वाभिमानी आहे. आदिवासींच्या नव्या पिढीपुढे पुन्हा एकदा त्यांच्या गत पराक्रमी इतिहासाचा पाढा वाचण्याची वेळ त्यामुळेच येऊन ठेपली आहे. त्यामुळे त्यांच्या मनाची निर्माण झालेली द्विधास्थिती दूर होऊन त्यांच्या मनात दडलेली कमीपणाची, मागासलेपणाची भावना दूर होईल. शिवाय 'आदिवासी' या शब्दात जी अस्मिता, जो आत्मसन्मान, जो स्वयंगौरव आहे तो वनवासी या संज्ञेत नाही. भारतातील आदिवासी देखील स्वत:ला वनवासी म्हणून घेण्यापेक्षा 'आदिवासी' म्हणून घेणेच अधिक पसंत करतात. आदिवासी समाजाच्या वेगळेपणाचीच ही निशाणी नव्हे काय ?

• • •

# भारतीय आदिवासी आणि जागतिकीकरण

**धनाजी पाटील, श्रीकांत राठोड**

**प्रस्तावना**

भारतीय समाजाचे विभाजन नागरी समाज, ग्रामीण समाज आणि आदिवासी समाजामध्ये झालेले आहे. नागरी आणि ग्रामीण समाजापेक्षा आदिवासी हा समाज लोकसंख्येने कमी व मागास आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी समाज कशा पद्धतीने आपले अस्तित्व राखून आहे व आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कशा पद्धतीने अस्तित्व राहणार, हे आपण या लेखात पाहणार आहोत. प्रस्तुत लेख दुय्यम माहिती स्त्रोतावर आधारित असून, त्यामध्ये आदिवासींचे भारतातील स्थान, आदिवासीचा अर्थ व व्याख्या, आदिवासींचे अनन्यसाधारण महत्त्व, जागतिकीकरणात आदिवासी, जागतिकीकरणातील आदिवासींसमोरील आव्हाने या विषयाचे विवेचन केले आहे.

**भारतातील आदिवासीचे स्थान**

भारतात एकूण ४२७ आदिवासी जमाती आहेत. महाराष्ट्रामध्ये ४७ आदिवासी जमाती येतात. भिल्ल, गोंड, संथाळ, कोरकू या लोकसंख्या व प्रदेशानुसार वास्तवाचा विचार करता देशातील प्रमुख आदिवासी जमाती आहेत. २००१ च्या जनगणनेनुसार आदिवासींचे प्रमाण सुमारे १०% इतके आहे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत आदिवासींची लोकसंख्या ८५.७७ दशलक्ष इतकी आहे. आदिवासी जमातींना ग्रीयसन, ठक्करबाप्पा यांनी मूळचे रहिवासी (Aborigienal) हट्टने यांनी प्राथमिक समाज (Primitve Society) महात्मा गांधी यांनी गिरीजन, डॉ. घुर्ये यांनी मागासलेले हिंदू (Back ward Hindus) तर भारतीय राज्य घटनेतील कलम ३४२ (२) नुसार अनुसूचित जमाती (Scheduled Tribes) असे म्हटले आहे. भारतातील बिहार या राज्यात आदिवासींचे प्रमाण जास्त आहे. तर महाराष्ट्रात चंद्रपूर जिल्ह्यात जास्त आहे.

**आदिवासीचा अर्थ व व्याख्या :**

'आदिवासी' या शब्दाची फोड केल्यास आदि म्हणजे पूर्वीपासूनचे वासी, म्हणजे निवास करणारा. या दोन शब्दापासून आदिवासी हा शब्द निर्माण झाला. आदिवासी म्हणजे आधीपासून वास्तव्य करणारा समाज होय. मानववंशशास्त्रज्ञांनी प्रत्यक्ष निरीक्षण पद्धतीद्वारे आदिवासींचा अभ्यास करुन आदिवासी समाजाच्या परिभाषा केल्या आहेत.

**डॉ. डी. एन. मुजमदार**

समान नाव असणारा एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा, विवाह, व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निषेध, नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पद्धतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा कुटुंब समुहाचे एकत्रिकरण म्हणजे आदिवासी समूह होय.

**डब्ल्यु. एच. रिव्हर्स**

''आदिवासी समुदाय हा एक साधा समूह.

त्यातील सभासद सामान्य बोली बोलतात आणि युद्ध व इतर उद्देशाच्या पूर्तीसाठी परस्परांना सहकार्य करतात.''

मानववंशशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्यावरुन आदिवासी संदर्भात समर्पक माहिती मिळते.

**आदिवासींचे अनन्यासाधारण महत्त्व**

एक मानवी समुदाय म्हणून आदिवासी जमातीचा अभ्यास करता त्यांच्या बहुआयामी व निसर्गसानिध्यातील स्वच्छंदी जीवनाची कल्पना येते. मुख्य समाज प्रगत असला तरी जंगलातील या निरक्षर आदिवासींकडून बऱ्याच गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. मुख्य समाजाने भौतिक तत्त्वावर प्रगती केली असली तरी आदिवासींचे श्रेष्ठत्व अनेक बाबींद्वारे स्पष्ट होते.

१. आदिवासी जमाती पर्यावरण संरक्षणासाठी चळवळीत सहभाग घेऊन 'निसर्गासाठी आम्ही' ही तत्वप्रणाली आधुनिक समाजाला प्रेरणादायी आहे.

२. आदिवासी नृत्य, संगीत, लोकसाहित्य, हस्तकला, चित्रकला, उत्सव व कलात्मकता याद्वारे आदिवासींच्या सांस्कृतिक श्रीमंतीची प्रचिती येते. या सांस्कृतिक ठेव्याचे जतन करण्याची गरज आहे.

३. सामाजिक एकरूपता, वडीलधाऱ्यांचा आदर, शिस्त, नैतिक व सामाजिक मूल्यांची जोपासना हे आदिवासींचे गुण व्यवहारी जगाला मार्गदर्शक आहेत.

४. उच्च समाजात हुंडापद्धती, स्त्रियांवर होणारा अत्याचार व शोषणाचे कारण असून आदिवासींच्या वधूमूल्य प्रथेने स्त्री वर्गाला मिळणाऱ्या दर्जाचे स्पष्टीकरण मिळते.

५. भिल्ल या देशातील मोठ्या आदिवासी जमातीमध्ये गर्भपाताला बंदी असून मुख्य समाज या मुद्यांवर यशस्वी धोरण राबवू शकलेला नाही.

६. आदिवासींना जंगलातील औषधी वनस्पतींचे ज्ञान असून त्यांना ''नैसर्गिक वैद्य'' असे म्हटले जाते. आधुनिक वैद्यकशास्त्रज्ञ या आदिवासींच्या मदतीवरच अवलंबून आहेत.

७. आदिवासींना पर्यावरणीय जाणीव असून वनसंरक्षण व संवर्धनात त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. निसर्गपूजा, निसर्गप्रेम यातून पर्यावरणीय जाणीव स्पष्ट होते. मुख्य समाजाने निसर्ग ही आपली जहागीर मानल्याने त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले आहे.

८. गोंड या आदिवासी जमातीतील 'गोटूल प्रथा' हे लैंगिक शिक्षणाचे केंद्र असून आधुनिकतेच्या वैचारिक गप्पा मारणाऱ्या मुख्य समाजाला डोळ्यात अंजन घालणारी ही बाब आहे.

या सर्व बाबींचा विचार करता सामाजिकता व मूल्यांचा विचार करता आदिवासीमधील दूरदृष्टी व जागृकतेची कल्पना येते. ज्या सामाजिक प्रश्नावर मुख्य समाज आजही अडलेल्या अवस्थेत आहे, त्याची पूर्तता आदिवासींनी परंपरेने केलेली आहे. जंगलात राहणाऱ्या या जमातींना रानटी की, प्रगत समजायचे याचा आपण विचार करण्याची गरज आहे.

**जागतिकीकरण आणि आदिवासी**

भारताचे माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंगराव यांनी सन १९९०-९१ या कालावधीत जागतिकीकरण

हा स्वीकारलेल्या खुल्या आर्थिक धोरणाचा भाग आहे. देशाने जागतिकीकरणाची अंमलबजावणी आयात प्रतिमानाच्या आधारे केली असून त्यामुळे मिळणाऱ्या लाभापेक्षा भोगाव्या लागणाऱ्या दुष्परिणामाचे पारडे अधिक जड आहे. मुख्य समाजाचा आदिवासीशी असलेला संबंध हा स्वार्थापोटीचा आहे. भारतातील जागतिकीकरण हे धनिकापुरते लाभदायी असून दलित, आदिवासींना भरडणारे आहे. आदिवासी स्त्रिया व मुलींच्यावर होणारे अत्याचार, कुपोषण, उपासमारीमुळे मरण पावणारे आदिवासी, वनअधिकारी व पोलिस अधिकाऱ्यांचे अत्याचार, आदिवासींच्या खुलेआम होणाऱ्या कत्तली, गुन्हेगारीचा शिक्का माथी घेऊन भटकणारे फासेपारधी, आदिवासींच्या नावावर कर्ज घेऊन वावरणारे दलाल, भुकेचा डोंब विझविण्यासाठी कडबा दळून खाणारे ओरिसातील आदिवासी, आदिवासीवरील 'गिरीजन' उल्लेख हा Emotional Blackmailing व Discrimination चा प्रकार होता. आदिवासीचा माणूस म्हणून जगण्याचा संघर्ष आजही सुरु असून अत्याचार, शोषणाद्वारे याची प्रचिती येते.

**जागतिकीकरणात आदिवासी समोरील आव्हाने**

सद्यस्थिती आदिवासीची शोषणाची परिसीमा स्पष्ट करणारी १३ राज्यात उग्ररुप धारण केलेली नक्षलवादी चळवळ हा त्याचा परिपाक आहे. सध्याचे जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण हे विषमतेला वाव देणारे असून 'बळी तो कान पिळी' हा त्याचा न्याय आहे.आदिवासी या प्रक्रियेत ओढला गेल्याने त्यांच्यासमोर अनेक आव्हाने निर्माण झालेली आहेत.

- जागतिकीकरणामुळे आदिवासी संदर्भात बहुराष्ट्रीय कंपन्या या नव्या शोषकाची भर पडली आहे.या कंपन्यांनी जंगलाकडे मोर्चा वळविल्याने व्यावसायिक जगात आदिवासी कोणत्याही पातळीवरुन त्यांच्याशी स्पर्धा करु शकत नाहीत. एका बाजूला जंगल संपत्तीच्या आधारे करोडो रुपये मिळवणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या तर दुसरीकडे जगण्याची साधने गेल्याने आदिवासींचे जगणे कठीण झाले आहे.
- आदिवासी समाजासमोर दुसरे मोठे आव्हान आहे ते म्हणजे स्थानिक कला, परंपरा, लोककला, हस्तकला, व्यवसाय, जीवन उपयोगी वस्तूचे अस्तित्व राखून ठेवणे.
- अक्षर ओळख नसलेल्या विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या जमातींना जागतिकीकरणाच्या प्रक्रियांमुळे उच्च व आधुनिक शिक्षण, इंग्रजी भाषेचे ज्ञान आत्मसात करणे, तंत्रज्ञान आणि माहिती प्रसार साधनांचा वापर करणे, दळण-वळणाची साधने व वैद्यकिय सुविधा घेणे हे एक मोठे आव्हान आज त्यांच्यासमोर आहे.
- जागतिकिकरणाच्या प्रक्रियांमध्ये मुक्त व्यापार धोरणाचे ज्ञान आत्मसात करणे व त्याचा प्रसार करणे, त्याचबरोबर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर होणारा परिषदा, चर्चासत्र यामध्ये आदिवासी समाजाचे प्रतिनिधित्व करणारे नेतृत्व निर्माण करणे.
- आदिवासींची शेती कसण्याची पद्धती ही खूप मागास अशी आहे. त्यांनी आधुनिक बि-बियाणे, कृषी अवजारे, पोषक द्रव्य, संकरीत जनावरांची पैदास करुन मुख्य समाज आणि

आपणात असणारी विषमता दूर करणे.

- आदिवासी समाज जरी निसर्गप्रेमी, पर्यावरण संवर्धन करणारा असला तरी जागतिकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय संकटावर सामोरे जावे लागणार आहे. तापमान वृद्धी, हवामानातील बदल, महापूर, दुष्काळ इत्यादी.
- शिक्षणाचे खाजगीकरण हे आदिवासींसमोर असणारे एक आव्हान आहे. यामुळे आदिवासी तरुण-तरुणींना उच्च शिक्षण, कायद्याचे शिक्षण अभियांत्रिकी शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, व्यवसाय व संगणकाचे ज्ञान यापासून वंचित राहावे लागणारे आहे. त्यामुळे आदिवासी समाजात बेकारीचे प्रमाण वाढणार आहे. आधुनिक वित्तप्रणाली हे सुद्धा आदिवासी समोर असणारे आव्हान आहे. जागतिकीकरणामुळे सामाजिक बँकींगचा प्रश्न निर्माण झाला असून त्यामुळे सावकार, जमीनदार, ठेकेदार यांच्या कर्जाचा बोजा वाढणार आहे.
- आदिवासी समाजाला जर आपले अस्तित्व राखून ठेवायचे असेल तर त्यांनी सर्वसमावेशक विकास साधणे आवश्यक आहे आणि ते त्यांच्यासाठीचे आव्हान आहे.

**समारोप**

आदिवासी हा समाजाचा घटक आहे अशा सकारात्मक दृष्टीकोनाची गरज आहे. अत्याचार, शोषण, जंगल, जमीन हक्कांवरील गदा, मुख्य समाज व सरकारची अनावस्था यामुळे आदिवासी अपेक्षा टिकून आहे. आदिवासींच्या नावावरील विकासाची फळे इतरांनीच लाटलेली आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आदिवासी समाजाचा अस्तित्वाचा संघर्ष म्हणून नक्षलवादी चळवळ उग्र बनली आहे. आदिवासींची संस्कृती, त्यांची संसाधने, आदिवासींचे आर्थिक व शाश्वत विकासातील महत्त्व या बाबी विचारात घेता माणूस म्हणून जगण्यासाठी त्यांना संरक्षण देणे ही देशाची जबाबदारी व आदिवासींचा हक्क आहे. जागतिकीकरण टाळता येत नसले तरी त्याची अंमलबजावणी आदिवासींचा विचार करता संरक्षक कवचात झाली पाहिजे.

धनाजी पाटील, श्रीकांत राठोड
समाजशास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

• • •

# आदिवासी साहित्य-भाषा व शैली

**वीरसिंग पाडवी**, नंदूरबार

आदिवासी साहित्य, भाषा व शैली याचा विचार करताना प्रथम आपण आदिवासी जीवन पद्धतीचा विचार केला पाहिजे. तेव्हा असे लक्षात येते की, आदिवासी या नावाप्रमाणेच आदिवासीची जीवन पद्धत देखील आदि-अनादी काळापासून चालत आली आहे, हे लक्षात येते आणि दुसरे असे की ह्या जीवन पद्धतीवरुनच आदिवासींना आदिवासी म्हणून ओळखले जात असते हे लक्षात ठेवले पाहिजे. त्या जीवन पद्धतीलाच दूसरे नाव आहे, 'संस्कृती परंपरा' ही संस्कृती परंपरा अनादी काळापासून आजतगायत टिकून राहिलेली आहे. त्या संस्कृती परंपरेचे दुसरे अंग म्हणजे साहित्य. आदिवासी साहित्य व संस्कृती एका पिढी-कडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होत होत सरकत सरकत अनुकरण करत पुढे पुढे चालत आलेली आहे.

संस्कृती अनेक परंपरा विविध भाषा यांच्या विळख्यात सापडूनही ती टिकून राहिली आहे. आदिवासींच्या विविध जमाती, भाषा आणि भाषा-शैली आहेत आणि त्या त्या बोली भाषेतून त्यांचे मौखिक साहित्य आहे. त्या साहित्यात त्यांची बोली भाषा व भाषा अलंकार उदा. म्हणी, उखाणे, वाक्प्रचार कथा, कहाण्या, विविध कला, वाद्य, तालसूर, नाद, गाणी, गीते, नृत्य, पेहराव, खान पान, दाग दागीने, शिंगार आणि त्यांची पूजा-अर्चा, सण, उत्सव, रीती-रीवाज, देवी देवता इत्यादी सर्व आदिवासी संस्कृतीत व साहित्यात परिपूर्ण सामावलेले आहे. परंतु इतर लोकांनी समजून न घेतल्यामुळे, आदिवासींचे जीवन न समजल्यामुळे रानटी जंगली असंस्कृत म्हणून हिणवण्याचे काम केले आहे. आदिवासीची संस्कृती आणि साहित्य आगळे वेगळे असल्याने स्वत:ला सुसंस्कृत नागरी संस्कृतीचे सुधारलेले समजणाऱ्या लोकांनी आदिवासी साहित्य संस्कृतीला मागासलेली समजून सुसंस्कृत करण्यासाठी देखील चालवलेला आहेत. आपली संस्कृती त्याच्यावर लादत आहेत. परंतु कोणत्याही समाजाच्या सामाजिक जीवनाचे दर्शन घडवून देणारे प्रमुख अंग म्हणजे मौखिक लोक-साहित्य. ह्या लोक साहित्यामुळेच त्या समाजाचा सामाजिक दर्जा आणि जडण-घडण, त्यांचा इतिहास इत्यादी अंगाचे प्रतिबिंब त्यातून दिसत असते. त्यासाठी लोक साहित्याचा उपयोग त्यांच्या ओळखीसाठी केला जात असतो.

आदिवासी जमातीचे लोक दूर दऱ्या-खोऱ्यांत, जंगलात, निसर्ग सृष्टीच्या सानिध्यात राहात असल्याने त्याच्या संस्कृतीवर आणि साहित्यावर निसर्गसृष्टीचा आणि भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव पडत असतो आणि त्यांची जीवन शैली म्हणजे आनंदमयच असते. साहित्याची खाणच असते. आदिवासी जमाती भले आर्थिकदृष्टीने कमजोर असतील; परंतु साहित्यिक-दृष्टीने श्रीमंत आहेत. साहित्य म्हणजे काय अजून त्यांना वाङ्मयीन भाषेत कळालेले नाही. तरी देखील त्यांनी अनादी काळापासून आजपावेतो संस्कृती

साहित्याच्या प्रभावाखाली असून देखील आपले मौखीक साहित्य अबाधित ठेवले आहे. आणि त्यात निसर्ग सृष्टी सौंदर्याचा मोठा परिणाम त्यांच्या साहित्यावर दिसून येत आहे. आदिवासी माणूस हा आधी सांगितल्याप्रमाणे आनंदमय जीवन जगणारा असल्यामुळे दुःख आणि सुख दोघांना सारखाच समोर जातो व उठता बसता काम करताना सर्व ठिकाणी आपल्या स्वभावानुसार आनंदमय वातावरण निर्माण करत असतो. आपल्या लोकगीतांचा आनंद लुटत असतो. काम करता करता गीते गात असतो. दुःखाच्या प्रसंगी देखील गीतमय आपले दुःख व्यक्त करीत असतो, उदा. एखाद्या कुटुंबात मयत झाली असता कुटुंबातील वृद्ध महिला, मयत व्यक्तीचे नाव घेऊन रडताना काव्यमय रडत असतात. उदा. असे मॉ ऽ ऽ ऽ पोपटा ऽ ऽ ऽ मॉ ऽ ऽ ऽ चीडा काही सोडून जातो. रियोरा ऽ ऽ ऽ मॉ ऽ ऽ ऽ पोपटा

भावार्थ : निसर्गातील पक्षी पोपट आणि चिमणीचे त्यात उदाहरण दिले आहे की माझा पोपट माझा चिमण्या मला सोडून कुठे निघून गेला अशा- प्रकारे वर्णन करुन महिला रडत असतात, तर शेतात कामाला गेल्यावर शेतकऱ्याला चिडवून करमणूक करणारे हे गीत.

उदा. (१) ओतो खोलो वादावी रेहलो चिपट्या टालो काडी रेहलो ऽ ऽ ऽ रा कामू वाल्या आमू मोदुर्या तोडी तोडी बारे फेकी काड्या ऽ ऽ ऽ रा.

भावार्थ : चिपट्या नावाचा शेतकरी आहे, त्याला उद्देशून शेतात एवढे मोठे गवत वाढवून ठेवले आहे टालेच्या टाले ते आम्ही कामकरी बाया तोडून तोडून शेता बाहेर काढीत आहेत अश्या अर्थाचे गीत आहे.

(२) सापऱ्यामा कुवो खोदो
बोयके पाणी वावो, ऽ ऽ वो
चालवा फोलनी मोवू भावने
कोसली कोमाय पाकी ऽ ऽ वो

भावार्थ : खडकात विहीर खोदून टेकड्यावर, डोंगरावर पाणी नेऊन पिकाची कमाई पिकवली आहे. ती पाहायला तू चल माझ्या बरोबर असे प्रेयसीला म्हणता आहे या अर्थचे हे गीत आहे.

३) रोगली मुहली मोऱ्या कुटू ।।
ऐखली धोमकाडू ।।
एक ठोबलो पेज काडू ।।
ऐखली हारकाडू ।।
हेगात्या पोयऱ्या पेज मागेता ।।
साटली पिलकाडू ।।

भावार्थ : रंगीत मुसळी आहे. तिच्याने साळ (भात) कांडते आहे मातीच्या परातीत. ती भरून मी एकटीच पेज पिणार आहे. सोबतच्या मुली पेज मागतील त्यांना लाकडी चमचा (साटू) पिलकावून तुम्हाला देणार नाही. असा गीताचा अर्थ आहे.

४) आपू होमचो का वेलो चिलारी जालामे तो
खाचडो का गुथलालो चिलारी जालामे

भावार्थ : आपले प्रेम कुठं जुळले तर ते चिलार नावाच्या काटेरी जाळीत आणि तुझ्या साडीचा पदर त्याच्यात अडकला होता. या अर्थाने हे प्रेमगीत असून धुळे, नंदूरबार जिल्ह्यातील आदिवासी भागात गाव

दिवाळी नावाचा एक सार्वजनिक लोक उत्सव साजरा होत असतो. त्या उत्सवात सोंगाड्या नावाचे कलाकार लोकनाट्य सादर करतात आणि आदिवासी पारंपरिक गीते गातात. त्या गीतात विविध भाव सादरीकरण करण्यात येत असतात. देवाची गीते देवाची स्तुती करणारी गीते, प्रेमगीते, भावगीते स्मृतीगीते, व्यथा मांडणारी गीते इत्यादी गीतांचा त्यात सहभाग असतो. त्यांना रोडाली असे म्हणतात. रोडालीचा अर्थ अनेक अंगाने, अनेक भावाने सामावलेला शब्द आहे. उदा. रोड म्हणजे आवड आवडणारा रोडे म्हणजे प्रेमाचा, मायाचा, रोडचा अनेक वचनी, रोडाली म्हणजे आवडणारी आवडीची, रोडाला म्हणजे आवडणारा, आवडीचा मायेचा, प्रेमाचा, ममतेचा आशाप्रकारे अनेक भावना त्यात सामावलेल्या आहेत. अशा अर्थाने रोडाली. अनुसरुन रोडाली गीते, गाव दिवाळी उत्सवात सादर करण्यात येत असतात, आणि कोणत्याही गीताता स्त्री-पुरुषाच्या संवादाच्या रुपात रोडाली रोडाला हा शब्द येत असल्याने गीतांना रोडाली गीते नाव पडले असावे. पावसाळा सुरू होण्याच्या आधी जंगलातील पक्षी जोर-जोरात ओरडत कोकीळा कुहु ऽ ऽ कुहु आवाज काढून ओरडायला लागते. मोर देखील म्यावो ऽ ऽ म्यावो करुन ओरडतो आणि आकाशातील ढगांना पाहून नाचतो. ह्या पशू-पक्षांची संकेतभाषा ऐकून मानव प्राण्याला देखील अंदाज बांधता येतो की पुढे काय होणार आहे ते या अंदाजावरुन तो एकमेकांना शरीराच्या अवयवाचा इशारा (केव्हा हाव भाव करुन एक दुसऱ्याशी वार्तालाप करत होता. अनादी काळी मानव प्राणी बोलत नव्हता असे मत डॉ. ग्रियसन यांचे आहे. मानव प्राणी समुदायाचे गटा-गटाने राहणारा प्राणी असल्याने एक दुसऱ्याची वार्तालाप करण्याची त्याला गरज पडली असावी आणि आपली हाव-भावाची भाषा, इशारा इ. नंतर आपल्या आवाजाला शब्दबद्ध करुन थोडा थोडा बोलायला सुरुवात केली असावी. सुरुवातीची बोलीभाषा काव्यमय लयबद्ध होती, असे मत भाषातज्ञांचे आहे. म्हणून आजही जंगल, दऱ्या-खोऱ्यातील माणूस बोलतो तेव्हा हेलखावे देत लय लावून बोलताना आढळतो. मानवप्राणी इतर प्राण्यांपेक्षा थोडा काही गुण-वैशिष्ट्यांनी वेगळा आहे. ते गुण इतर प्राण्यांत दिसून येत नाहीत. उदा.

१) मानव प्राणी भूतकाळाच्या घडलेल्या घटनांची आठवण ठेवत असतो. इतर प्राणी तसे करु शकत नाहीत.

२) मानव प्राणी विचार करणारा असल्याने आपले विचार कल्पनेने साकारु शकतो. इतर प्राणी तसे करु शकत नाही.

३) वरील दोन्ही वैशिष्ट्यांद्वारे मानव प्राणी दुसऱ्यासमोर भूतकाळातील घडलेल्या घटना आठवणीने आणि आपल्या कल्पनेने विचार करुन मांडू शकतो, प्रतिमा उभी करु शकतो.

त्याला बोलीभाषा निर्माण करण्याचे हे गुण त्याच्या अंगी असल्याने गरज पडली असावी आणि बोलीभाषा निर्माण केली असावी, असे वाटते. ज्या प्रमाणे पशू-पक्षांच्या आवाजाचा प्रभाव मानवाच्या बोलीभाषेवर, भाषा शैलीवर पडला असावा. त्याच-प्रमाणे भौगोलिक चढउतार डोंगर-दऱ्याचाही मानवाच्या स्वरकंठीवर पडल्याचे मत डॉ. ग्रियसन

याचे आहे. मानव जंगल, डोंगर-दऱ्याखोऱ्यांत फिरताना श्वासोश्वास जोर जोरात घेत असतो. सपाटीवर फिरताना चालताना एकसारखा संथ गतीने श्वास चालतो, त्याप्रमाणे मानवाचा श्वासोश्वासावर परिणाम होऊन त्याच्या आवाजावर, वाणीवर देखील त्याचा परिणाम झाला असावा. आदिवासी माणसाचा आवाज म्हणजे पहाडी आवाज म्हणून ओळखला जातो. आदिवासी जातीचे लोकसाहित्य व भाषा आणि त्याची विविध शैली त्याच्या साहित्यात आढळते.

डॉ. ग्रियसन ह्यांनी आपल्या देशात इ. स. १९१५ साली विविध भाषांचे संशोधन करायला सुरुवात करुन तब्बल तो २१ वर्षे संशोधन करीत राहिला होता. त्यांच्या मते ४०० वर्षांपूर्वी आपल्या देशात ६ हजार बोली भाषा होत्या. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इ. स. १९६१ ला भाषा वार प्रांत रचनेसाठी भाषांचे सर्वेक्षण व संशोधन करण्यात आले, तेव्हा १६ ते ५२ भाषा आपल्या देशात होत्या, अशी माहिती भाषा संशोधन केंद्र तेजगढ, गुजरात यांच्याची चर्चा करताना मिळाली. त्यानंतर पुन्हा भाषा संशोधनाचा कायदा इ. स. १९७१ साली संशोधन व सर्वे करण्यात आला, त्यावेळेला कायद्याप्रमाणे १० हजारापेक्षा जास्त गावात जी भाषा बोलली जात असेल तीच भाषा गृहीत धरावी. सर्वेक्षणाच्या यादीत घ्यावी असा कायदा करण्यात आल्यामुळे इ. स. १९७१ सालच्या सर्वेक्षणात १५ शे भाषा घेतल्या गेल्या नाही. काढून टाकण्यात आल्या. या १५ शे. भाषा आदिवासी जमातींच्या होत्या. मूळत: त्या १० हजार गावाच्या वस्तीत बसत नसल्याने काढून टाकण्यात आल्या. त्यामुळे एक प्रकारे आदिवासींच्या अस्तित्त्वाला धोकाच निर्माण झाला आहे. बऱ्याच भाषा व साहित्य लुप्त होण्याच्या वाटेवर आहे.

आदिवासींचे नृत्य व वाद्यांचा विचार करताना नृत्यकला ही त्याची उपजत कला आहे. नृत्यकला शिकण्यासाठी कुठे जावे लागत नाही. पारंपरिक पद्धतीने सण-उत्सवातून अवगत करुन घेतात. नुसते नाचतच नाही तर गातातही. गात जाऊन नाचतात तसेच त्यांच्या वाद्याच्या बाबतीतही आहे. त्यांची वाद्ये आणि संगीताची साधने त्यांच्या वाड-वडिलोपार्जीत आहेत. ती झाडाच्या खोडापासून तर दुधी भोपळ्यापासून, बांबूपासून, जनावराच्या कातडीपासून, जनावराच्या केसापासून पारंपरिक पद्धतीने तयार करुन घेत असतात. त्यात त्यांच्या वाडवडील पूर्वज आणि कलाकाराच्या कल्पना शक्तीचे दर्शन घडताना दिसते. अशाप्रकारे त्यांनी संगीताचा विकास केल्याचे लक्षात येते. आदिवासी जमातींना त्यांच्या कला साहित्याचे महत्त्व त्यांना कळून आल्यामुळे त्यांच्या पूर्वजांनी नाच गाणे, वाद्य, संगीत इत्यादीचा आनंद दुसरीकडे कुठेच नाही म्हणून त्यांनी साहित्य-संस्कृतीचा वारसा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

• • •

# मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या स्थलांतराचा अभ्यास

**प्रा. डॉ. जयवंत इंगळे,** सांगली

### १. प्रास्ताविक

ज्यांना स्वत:ची अशी विशिष्ट संस्कृती आहे आणि जे डोंगर-दऱ्यांनी वेढलेल्या व दाट झाडीच्या प्रदेशात वास्तव्य करतात त्यांना आदिवासी लोक असे म्हणतात. एखाद्या राज्याचा अपवाद वगळता भारतातील सर्व राज्यात आदिवासींचे वास्तव्य असून महाराष्ट्रातही अनेक जिल्ह्यांत आदिवासींचे वास्तव्य आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ९.६८ कोटी इतकी आहे. तर आदिवासींची लोकसंख्या ८५.५७ लक्ष इतकी आहे. महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ८.८५ टक्के इतके आहे. प्रस्तुत शोधनिबंधात ठाणे जिल्ह्यातील ज्या मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या स्थलांतराच्या समस्येचा अभ्यास केला आहे, त्या मोखाडा तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ९३.४६ टक्के इतके आहे. महाराष्ट्रात ४७ विविध आदिवासी जमाती आहेत. तर अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यात महादेव कोळी, ढोर कोळी, कातकरी, वारली, कोकणा, म. ठाकूर आणि क ठाकूर अशा विविध सात आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे.

### २. संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये

प्रस्तुत संशोधन विषयाची प्रमुख उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. दरवर्षी परगावी स्थलांतर कराव्या लागणाऱ्या आदिवासींच्या स्थलांतरामागची कारणे अभ्यासणे.

२. आदिवासींच्या स्थलांतराची वैशिष्टये अभ्यासणे.

३. आदिवासींना परगावी किती दिवस काम मिळते आणि किती मजुरी मिळते ते पाहणे.

४. स्थलांतराचे परिणाम अभ्यासणे.

५. स्थलांतर करणाऱ्या आदिवासींच्या हाल-अपेष्टा कमी व्हाव्यात यासाठी उपाय सुचविणे.

### ३. संशोधन विषयाचे महत्त्व

प्रस्तुत संशोधकाने ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात काही वर्षे नोकरी केली असून नोकरीच्या निमित्ताने आदिवासींच्या सानिध्यात वास्तव्य केले आहे. आदिवासी समाजातील वास्तव्याच्या काळात आदिवासींना भेडसावणाऱ्या विविध समस्यांची जाणीव संशोधकास झाली होती. उदरनिर्वाहासाठी बहुसंख्य आदिवासींना दरवर्षी दूरवर दाही दिशा भटकावे लागत असल्याचे आणि परगावी स्थलांतराच्या ठिकाणी त्यांचे मोठे शोषण होत असल्याचे आदिवासी भागात फिरत असताना प्रस्तुत अभ्यासकाला समजून आले. या शोधनिबंधात स्थलांतराच्या कारणाबरोबरच स्थलांतरामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचाही अभ्यास केला आहे. तसेच स्थलांतर करावे लागू नये यासाठी काही शिफारशीही सुचवल्या आहेत. म्हणून हा शोधनिबंध आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध प्रकारे प्रयत्न करणाऱ्या शासनाला अत्यंत उपयुक्त आहे.

### ४. संशोधन पद्धती

आदिवासींच्या प्रश्नांचा अभ्यास चांगल्या प्रकारे करता यावा यासाठी आदिवासी कसे जीवन जगतात याची माहिती अभ्यासकाला असणे आवश्यक असते. प्रस्तुत अभ्यासकाने नोकरीच्या निमित्ताने मोखाडा तालुक्यातील आदिवासी समाजात काही वर्षे वास्तव्य केले होते. त्यामुळे आदिवासींच्या स्थलांतराचा अभ्यास करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्याची निवड केली. तसेच या तालुक्याची निवड करण्यामागचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे या तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ९० टक्केपेक्षा जास्त असून दरवर्षी स्थलांतर करणाऱ्या आदिवासींचे प्रमाण मोठे आहे. प्रस्तुत अभ्यासकाने पीएच. डी. साठी प्रबंध तयार करण्यासाठी सन २००४ साली मोखाडा तालुक्यातील विविध सात आदिवासी जमातींतील ४२० कुटुंबांचे त्यांच्या घरोघरी जाऊन सर्व्हेक्षण केले होते. त्या सर्व्हेक्षणावर आधारीत हा शोधनिबंध आहे. सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी २७० कुटुंबे परगावी कामासाठी स्थलांतर करतात असे आढळून आले. या २७० कुटुंबांचा अभ्यास या शोधनिबंधात केला आहे. आदिवासी समाजातील वास्तव्य, सहभागी निरीक्षण, चर्चा पद्धती आणि मुलाखती इत्यादी संशोधन पद्धतींचा वापर करून मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या स्थलांतराचा अभ्यास केला आहे. हा शोधबिंध संपूर्णपणे प्राथमिक साधनसामग्रीवर आधारीत आहे.

### ५. मोखाडा तालुक्यातील आदिवासींचे स्थलांतर

मोखाडा तालुक्यातील अदिवासींच्या बाबतीत स्थलांतर म्हणजे उदरनिर्वाहासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वर्षातील काही दिवस वास्तव्य करणे होय. तालुक्यातील आदिवासींना त्यांच्या मूळ भागात पुरेसा आणि खात्रीचा रोजगार मिळत नाही. त्यामुळे त्यांना दरवर्षी काही काळापुरते परगावी स्थलांतर करावे लागते. या भागात स्थलांतराची वैशिष्ट्ये, स्थलांतराची कारणे, परिणाम इत्यादी बाबींची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

### ५.१ स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे प्रमाण

खालील तक्त्यात सन २००३-२००४ या वर्षात मोखाडा तालुक्यातील किती आदिवासी कुटुंबांनी परगावी स्थलांतर केले होते याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक ५.१**

| स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे प्रमाण | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | जमातीचे नाव | स्थलांतर केलेल्या कुटुंबाची संख्या व प्रमाण | सर्व्हेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
| १. | महादेव कोळी | २६ (९.६२) | ६० | ४३.३३ |
| २. | ढोर कोळी | ३५ (१२.९६) | ६० | ५८.३३ |
| ३. | कातकरी | ५७.(२१.११) | ६० | ९५.०० |
| ४. | वारली | ४६ (१७.०३) | ६० | ७६.६६ |
| ५. | कोकणा | ३१ (११.४८) | ६० | ५१.६६ |
| ६. | म ठाकूर | ३४ (१२.५९) | ६० | ५६.६७ |
| ७. | क ठाकूर | ४१ (१५.१८) | ६० | ६८.३४ |
| | **एकूण** | **२७० (१००)** | **४२०** | **६४.२८** |

१. संदर्भ - प्राथमिक सर्व्हेक्षण

२. स्तंभ क्रमांक ३ मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे विविध सात जमातीतील स्थलांतर केलेल्या एकूण २७० कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

३. स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील स्थलांतर केलेल्या कुटुंबाचे त्याच विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण (प्रत्येक जमातीतील ६० कुटुंबे) कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्वेक्षण केलेल्या ४२० आदिवासी कुटुंबांपैकी २७० कुटुंबांना (६४.२८ टक्के) दरवर्षी स्थलांतर करावे लागते. स्थलांतर कराव्या लागणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण खूप मोठे असल्याचे दिसून येते. यावरून आदिवासींच्या दारिद्र्याची सुद्धा कल्पना येते.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० कुटुंबांपैकी ३५.७२ टक्के कुटुंबांनी किंवा त्यांच्या कुटुंबांतील कोणाही सदस्याने स्थलांतर केलेले नाही. यापैकी काही कुटुंबांची आर्थिक स्थिती दुर्बल असूनही त्यांनी स्थलांतर न करण्याची काही कारणे आढळून आली. ती म्हणजे कुटुंबात लहान मुले असल्याने परगावी कामासाठी जाता न येणे, शारीरिक अपंगत्व, कष्टाची कामे न झेपणे इत्यादी. या कारणामुळे काही आदिवासी कुटुंबांनी गरिबी असूनही कामासाठी परगावी स्थलांतर केले नाही.

विविध सात जमातींच्या तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत असून ते २१.११ टक्के आहे. तर सर्वात कमी प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते ९.६२ टक्के आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता असे दिसते की, कातकरी जमातीतील स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे प्रमाण ९५ टक्के एवढे मोठे आहे. या जमातीतील केवळ ५ टक्के कुटुंबांनी स्थलांतर केलेले नाही. वारली जमातीतील ७६.६६ टक्के कुटुंबांनी स्थलांतर केले असून या जमातीतील २३.३४ टक्के कुटुंबांनी स्थलांतर केलेले नाही. महादेव कोळी जमातीतील ४३.३३ टक्के कुटुंबांनी स्थलांतर केल्याचे वरील तक्त्यावरून दिसून येते. या जमातीतील ५६.६७ टक्के कुटुंबांनी स्थलांतर केलेले नाही.

### ५.२ सर्व सदस्यांसहित परगावी स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे प्रमाण

खालील तक्त्यात सन २००३-२००४ या वर्षात किती आदिवासी कुटुंबांनी आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांसहित (संपूर्ण कुटुंबासहित) स्थलांतर केले होते, याची माहिती दिली आहे.

### तक्ता क्रमांक ५.२

| सर्व सदस्यासहित परगावी स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे प्रमाण | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जमातीचे नाव | सर्व सदस्यांसहित स्थलांतर केलेल्या कुटुंबांची संख्या व प्रमाण | स्थलांतर केलेल्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
| १. | म. कोळी | ०१ (२.४३) | २६ | ३.८५ |
| २. | ढोर कोळी | ०२ (२.८७) | ३५ | ५.७१ |
| ३. | कातकरी | १९ (४६.३४) | ५७ | ३३.३३ |
| ४. | वारली | ०५ (१२.२०) | ४६ | १०.८६ |
| ५. | कोकणा | ० | ३१ | ० |
| ६. | म ठाकूर | १० (२४.४०) | ३४ | २९.४१ |
| ७. | क ठाकूर | ०४ (९.७६) | ४१ | ९.७५ |
| | एकूण | ४१ (१००) | २७० | १५.१८ |

१. संदर्भ : प्राथमिक सर्व्हेक्षण

२. स्तंभ क्रमांक ३ मधील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका किंवा विशिष्ट जमातीतील सर्व सदस्यांसहित स्थलांतर केलेल्या कुटुंबाचे विविध सात जमातीतील सर्व सदस्यांसहित स्थलांतर केलेल्या ४१ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

३. स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील सर्व सदस्यांसहित स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील स्थलांतर केलेल्या एकूण कुटुंबाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील स्थलांतर केलेल्या २७० कुटुंबापैकी ४१ कुटुंबांनी (१५.१८ टक्के) कुटुंबांतील सर्व सदस्यांसहित स्थलांतर केले होते.

विविध सात जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, कुटुंबातील सर्व सदस्यांसहित परगावी स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत असून ते ४६.३४ टक्के आहे. त्याखालोखाल हे प्रमाण म ठाकूर या जमातीत असून ते २४.४० टक्के आहे. कोकणा जमातीत हे प्रमाण शून्य आहे.

विविध सात जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता आणि एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की सर्वच जमातीत कुटुंबातील सर्व सदस्यासहित परगावी स्थलांतर केलेल्या कुटुंबांचे प्रमाण खूपच कमी आहे. हे प्रमाण का कमी आहे ते आदिवासींशी चर्चा करून जाणून घेतले. बहुसंख्य आदिवासींना आपल्या कुटुंबांतील स्त्रियांना, मुलींना परगावी कामास घेऊन जाणे सुरक्षित वाटत नाही. परगावी काही स्त्रिया नवऱ्यांना सोडून पळून जातात. तसेच काही स्त्रियांना पळवून नेले जाते. त्यामुळे आदिवासी तरूण आपल्या बायकांना गावीच ठेवून परगावी स्थलांतर

करतात. तसेच परगावी राहण्याची चांगली सोय नसणे, काही कष्टाची कामे स्त्रियांना न निभणे, गावाकडील घर सांभाळणे, लहान मुले सांभाळणे, मुलांचे शिक्षण, जनावरे सांभाळणे इत्यादी कारणांमुळे बहुसंख्य आदिवासी आपल्या कुटुंबातील स्त्रियांना परगावी कामाच्या ठिकाणी घेऊन जाण्याचे टाळतात.

### ५.३ स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या आदिवासी व्यक्तींचे प्रमाण –

सन २००३-२००४ या वर्षी १४ कुटुंबांनी आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांसहित स्थलांतर केले होते. तर २२९ कुटुंबांतील केवळ प्रौढ व्यक्तींनींच स्थलांतर केले होते. कुटुंबातील सर्व सदस्यांसहित जरी काही कुटुंबे स्थलांतर करत असले तरी लहान मुले व वृद्ध व्यक्ती तेथे काम करू शकत नाहीत. म्हणून उत्पन्नाच्या दृष्टीने स्थलांतराच्या ठिकाणी किती व्यक्ती काम करतात हे पाहणे महत्वाचे आहे.

खालील तक्त्यात स्थलांतर केलेल्या २७० कुटुंबातील किती व्यक्तींनी स्थलांतराच्या ठिकाणी काम केले याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक ५.३**

**स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या आदिवासी व्यक्तींचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नाव | स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या पुरूषांची संख्या व प्रमाण | स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या स्त्रियांची संख्या व प्रमाण | एकूण व्यक्ती व शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १. | म. कोळी | ३० (९०.९०) (८.७७) | ०३ (९.१०) (२.३६) | ३३ (१००) (७.०३) |
| २. | ढोरकोळी | ३७ (७५.५२) (१०.८२) | १२ (२४.४८) (९.४५) | ४९ (१००) (१०.४५) |
| ३. | कातकरी | ८१ (५९.५६) (२३.६८) | ५५ (४०.४४) (४३.३०) | १३६ (१००) (२९.००) |
| ४. | वारली | ६० (८३.३४) (१७.५५) | १२ (१६.६६) (९.४५) | ७२ (१००) (१५.३५) |
| ५. | कोकणा | ४५(७६.२८) (१३.१५) | १४ (२३.७२) (११.०२) | ५९ (१००) (१२.५१) |
| ६. | म. ठाकूर | ४६(७६.६७) (१३.४६) | १४ (२३.३३) (११.०२) | ६० (१००) (१२.८०) |
| ७. | क. ठाकूर | ४३ (७१.६७) (१२.५७) | १७ (२८.३३) (१३.४०) | ६० (१००) (१२.८०) |
| | **एकूण** | **३४२ (७२.९३)** (१००) | **१२७ (२७.०७)** (१००) | **४६९ (१००)** (१००) |

१. संदर्भ : प्राथमिक सर्व्हेक्षण

२. स्तंभ क्रमांक ३ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या पुरूषांचे त्याच विशिष्ट जमातीतील स्थलांतर केलेल्या एकूण व्यक्तींशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

३. स्तंभ क्रमांक ४ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका विशिष्ट जमातीतील स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या स्त्रियांचे त्याच विशिष्ट जमातीतील स्थलांतर केलेल्या एकूण व्यक्तींशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

४. स्तंभ क्रमांक ३ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या एका विशिष्ट जमातीतील पुरूषांचे स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या विविध सात जमातीतील एकूण ३४२ पुरूषांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

५. स्तंभ क्रमांक ४ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या एका विशिष्ट जमातीतील स्त्रियांचे स्थलातंराच्या ठिकाणी काम केलेल्या विविध सात जमातीतील एकूण १२७ स्त्रियांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

६. स्तंभ क्रमांक ५ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या एका विशिष्ट जमातीतील व्यक्तींचे सर्व सात जमातीतील स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या एकूण ४६९ पुरुष व स्त्री व्यक्तीशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

७. स्तंभ क्रमांक ५ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी किंवा शेकडा प्रमाण आहे.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, स्थलांतर केलेल्या २७० कुटुंबातील ४६९ व्यक्तींनी परगावी स्थलांतराच्या ठिकाणी काम केले असून त्यामध्ये पुरूषांचे प्रमाण मोठे आहे (७२.९३ टक्के) तर स्त्रियांचे प्रमाण अत्यंत कमी असून ते २७.०७ टक्के आहे.

विविध सात जमातींचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या सर्व जमातीतील एकूण ३४२ पुरुषांमध्ये सर्वात जास्त पुरुष व्यक्तींचे प्रमाण कातकरी जमातीत असून ते २३.६८ टक्के आहे. त्याखालोखाल हे प्रमाण वारली या जमातीत असून ते १७.५५ टक्के आहे. स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या एकूण पुरूषांमध्ये सर्वात कमी प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते ८.७७ टक्के आहे.

स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या सर्व जमातीतील एकूण १२७ स्त्रियांमध्ये सर्वात जास्त स्त्रियांचे प्रमाण कातकरी या जमातीत असून ते ४३.३० टक्के आहे. तर सर्वात कमी प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते २.३६ टक्के एवढे आहे.

पुरुष आणि स्त्रिया यांचा एकत्रित विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, स्थलांतराच्या ठिकाणी म्हणजे परगावी काम केलेल्या एकूण ४६९ व्यक्तींमध्ये सर्वात जास्त प्रमाण कातकरी जमातीत असून ते २९ टक्के आहे. त्याखालोखाल हे प्रमाण वारली या जमातीत असून ते १५.३५ टक्के आहे. तर सर्वात कमी प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते ७.०३ टक्के आहे.

एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरून असे दिसते की, महादेव कोळी जमातीतील

९०.९० टक्के पुरुषांनी परगावी काम केले आहे. तर या जमातीतील केवळ ९.१० टक्के स्त्रियांनी परगावी काम केले आहे. कातकरी जमातीतील एकूण १३६ व्यक्तीपैकी ५९.५६ टक्के पुरुषांनी परगावी काम केले आहे. तर ४०.४४ टक्के स्त्रियांनी परगावी काम केले आहे.

### ५.४ प्रतिकुटुंब स्थलांतरित मजुरांची सरासरी संख्या

खालील तक्त्यात प्रतिकुटुंब स्थलांतरित सरासरी संख्या दर्शविली आहे.

**तक्ता क्रमांक ५.४**

**स्थलांतरीत मजुरांची प्रतिकुटुंब सरासरी संख्या**

| अ.क्र. | जमातीचे नाव | स्थलांतर केलेल्या कुटुंबांची संख्या | स्थलांतरित कुटुंबातील मजुरांची संख्या | स्थलांतरित मजुरांची प्रतिकुटुंब सरासरी संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | म. कोळी | २६ | ३३ | १.२६ |
| २. | ढोरकोळी | ३५ | ४९ | १.४० |
| ३. | कातकरी | ५७ | १३६ | २.३८ |
| ४. | वारली | ४६ | ७२ | १.५६ |
| ५. | कोकणा | ३१ | ५९ | १.९० |
| ६. | म. ठाकूर | ३४ | ६० | १.७६ |
| ७. | क. ठाकूर | ४१ | ६० | १.४६ |
| | **एकूण** | **२७०** | **४६९** | **१.७३** |

संदर्भ : प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, विविध सात आदिवासी जमातीत प्रतिकुटुंब स्थलांतरित मजुरांची संख्या १.७३ इतकी आहे. प्रतिकुटुंब स्थलांरित मजुरांची सरासरी संख्या सर्वात जास्त कातकरी या जमातीत असून ती २.३८ एवढी आहे. तर सर्वात कमी महादेव कोळी या जमातीत असून ती १.२६ एवढी आहे.

### ५.५ स्थलांतराच्या ठिकाणी आदिवासी मजुरांनी केलेल्या कामाचे दिवस

खालील तक्त्यात स्थलांतराच्या ठिकाणी परगावी वर्षभरात आदिवासी मजुरांनी केलेल्या कामाचे एकूण दिवस, प्रतिकुटुंब सरासरी कामाचे दिवस आणि प्रतिमजूर सरासरी कामाचे दिवस यांची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक ५.५**

**स्थलांतराच्या ठिकाणी आदिवासी मजुरांनी केलेल्या कामाचे दिवस**

| अ. क्र | जमातीचे नाव | स्थलांतर केलेल्या कुटुंबांची संख्या | स्थलांतराच्या याठिकाणी काम केलेल्या मजुरांची संख्या | वर्षातील कामाचे एकूण दिवस | प्रतिकुटुंब सरासरी कामाचे दिवस | प्रतिमजूर सरासरी कामाचे दिवस |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | म. कोळी | २६ | ३३ | १८७० | ७१.९२ | ५६.६६ |
| २. | ढोरकोळी | ३५ | ४९ | ३४७० | ९९.१४ | ७०.८१ |
| ३. | कातकरी | ५७ | १३६ | ६००५ | १०५.३५ | ४४.१५ |
| ४. | वारली | ४६ | ७२ | ३६०० | ७८.२६ | ५०.०० |
| ५. | कोकणा | ३१ | ५९ | १७४० | ५६.१२ | २९.४९ |
| ६. | म ठाकूर | ३४ | ६० | २५३५ | ७४.५५ | ४२.२५ |
| ७. | क ठाकूर | ४१ | ६० | २८१० | ६८.५३ | ४६.८३ |
| | **एकूण** | **२४०** | **४६९** | **२२०३०** | **८१.५९** | **४६.९७** |

१. संदर्भ : प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, स्थलांतर केलेल्या २७० कुटुंबातील ४६९ मजुरांनी परगावी सन २००३-२००४ या वर्षात २२०३० दिवस काम केले. या २७० कुटुंबांच्या संदर्भात प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी कामाचे दिवस ८१.५९ इतके असून वार्षिक प्रतिमजूर सरासरी कामाचे दिवस ४६.९७ एवढे आहेत.

जमातीनुसार वर्षातील कामाचे एकूण दिवस, प्रतिकुटुंब सरासरी कामाचे दिवस आणि प्रतिमजूर सरासरी कामाचे दिवस इत्यादींची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

### वर्षातील कामाचे एकूण दिवस

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन २००३-२००४ या वर्षात कातकरी या जमातीतील आदिवासींनी इतर जमातींच्या तुलनेत परगावी सर्वात जास्त दिवस काम केले आहे. या जमातीतील १३६ मजुरांचे एका वर्षातील कामाचे एकूण दिवस ६००५ इतके आहेत. कोकणा या आदिवासी जमातीतील मजुरांचे कामाचे दिवस सर्वात कमी असल्याने वरील तक्त्यावरून दिसते. या जमातीतील ५९ मजुरांचे वर्षातील कामाचे एकूण दिवस १७४० इतके आहेत. कातकरी आदिवासींची आपला भू-भार सोडून परगावी जास्तीत जास्त काळ थांबण्याची क्षमता व वृत्ती असते. गरिबीमुळे व भूमीहीनतेमुळे परगावी जास्तीत जास्त दिवस कामास राहण्याची गरज त्यांना असते.

### प्रतिकुटुंब सरासरी कामाचे दिवस

वरील तक्त्यावरून असे दिसते की, प्रतिकुटुंब सरासरी कामाचे दिवस सर्वात जास्त कातकरी आदिवासींचे आहेत. (१०५.३५ दिवस). तर सर्वात कमी कोकणा या जमातीतील आदिवासींचे आहेत. (५६.१२ दिवस).

**प्रतिमजूर सरासरी कामाचे दिवस :**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, प्रतिमजूर सरासरी कामाचे दिवस सर्वात जास्त ढोरकोळी या जमातीतील आदिवासींचे आहेत. (७०.८१ दिवस). तर सर्वात कमी कोकणा या जमातीतील आदिवासींचे आहेत (२९.४९ दिवस).

**५.६ स्थलांतरीत मजुरांना परगावी मिळालेले उत्पन्न**

खालील तक्त्यात स्थलांतरीत मजुरांना परगावी मिळालेल्या उत्पन्नाची माहिती जमातीनुसार दिली आहे.

**तक्त क्रमांक ५.६**

**स्थलांतरित मजुरांना परगावी मिळालेले उत्पन्न**

| अ.क्र. | जमातीचे नाव | स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या कुटुंबाची संख्या | स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या मजुरांची संख्या | परगावी मिळालेले एकूण उत्पन्न (रु.) | प्रतिकुटुंब सरासरी उत्पन्न (रु.) | प्रतिमजूर सरासरी उत्पन्न (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | म. कोळी | २६ | ३३ | १४३३०० | ५५१२ | ४३४२ |
| २. | ढोर कोळी | ३५ | ४९ | २८३८९९ | ८१०९ | ५७९२ |
| ३. | कातकरी | ५७ | १३६ | ८६१६०० | १५११६ | ६३३५ |
| ४. | वारली | ४६ | ७२ | ३३०६०० | ७१८७ | ४५९२ |
| ५. | कोकणा | ३१ | ५९ | २०१७०० | ६५०६ | ३४१९ |
| ६. | म ठाकूर | ३४ | ६० | २६३७०० | ७७५६ | ४३९५ |
| ७. | क ठाकूर | ४१ | ६० | २४९००० | ६०७३ | ४१५० |
| | एकूण | २७० | ४६९ | २३३३७०० | ८६४३ | ४९७६ |

१. संदर्भ : प्राथमिक सर्व्हेक्षण

वरील तक्त्यावरून असे दिसते की, स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या २७० कुटुंबातील ४६९ मजुरांना सन २००३-२००४ या वर्षात परगावी मिळालेले एकूण उत्पन्न २३३३७०० रूपये एवढे आहे. स्थलांतरीत २७० कुटुंबांच्या संदर्भात वार्षिक प्रतिकुटुंब सरासरी उत्पन्न ८६४३ रूपये आहे. तर वार्षिक प्रतिमजूर सरासरी उत्पन्न ४९७६ रूपये एवढे अल्प आहे.

**परगावी मिळालेले वर्षाचे एकूण उत्पन्न**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन २००३-२००४ या वर्षात स्थलांतराच्या ठिकाणी सर्वात जास्त उत्पन्न कातकरी या जमातीतील मजुरांना प्राप्त झाले आहे. या जमातीतील ५७ कुटुंबातील १३६ मजुरांना ८६१६०० रूपये एवढे उत्पन्न प्राप्त झाले आहे. स्थलांतराच्या ठिकाणी काम केलेल्या सात जमातींना वर्षभरात मिळालेल्या एकूण उत्पन्नात कातकरी जमातींचा ३६.९१ टक्के एवढा मोठा हिस्सा आहे.

स्थलांतराच्या ठिकाणी सर्वात कमी उत्पन्न महादेव कोळी या जमातीतील मजुरांना मिळाल्याचे वरील तक्त्यावरून दिसून येते. या जमातीतील २६ कुटुंबातील ३३ मजुरांना १४३३०० रूपये एवढे उत्पन्न मिळाले आहे. स्थलांतरापासून सर्व जमातींना मिळालेल्या एकूण उत्पन्नात महादेव कोळी जमातीचा शेकडा हिस्सा ६.१४ एवढा आहे.

**प्रतिकुटुंब सरासरी उत्पन्न**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन २००३-२००४ या वर्षात प्रतिकुटुंब सरासरी उत्पन्न सर्वात जास्त कतकरी या जमातीचे आहे (१५११६ रूपये). तर सर्वात कमी उत्पन्न महादेव कोळी या जमातीचे असून ते ५५१२ रूपये एवढे आहे.

**प्रतिमजूर सरासरी उत्पन्न**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन २००३-२००४ या वर्षात प्रतिमजूर सरासरी उत्पन्न सर्वात जास्त कातकरी या जमातीचे असून ते ६३३५ रूपये एवढे आहे. तर सर्वात कमी वार्षिक प्रतिमजूर सरासरी उत्पन्न कोकणा या जमातीचे असून ते ३४१९ रूपये एवढे आहे.

**५.७ आदिवासींच्या स्थलांतराची वैशिष्ट्ये**

अभ्यासक्षेत्रातील ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या स्थलांतराची आढळून आलेली काही वैशिष्ट्ये थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहे.

आदिवासी स्वत:हून कामासाठी परगावी जातात. ते कोणाच्या दबावाने स्थलांतर करत नाहीत. बहसंख्य आदिवासी दरवर्षी (अनेक वर्षापासून) स्थलांतर करतात. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा अशा सर्व ऋतूत आदिवासी स्थलांतर करतात. अतिपावसाच्या दिवसात स्थलांतराचे प्रमाण कमी असते. सर्व आदिवासींचा परगावी राहण्याचा कालावधी सारखा नसतो. काही आदिवासी १० ते १२ दिवस तर काही आदिवासी १ ते २ महिने परगावी राहतात व गावी येतात. गावी काही दिवस मुक्काम करून परत परगावी कामासाठी जातात. अशा प्रकारे त्यांच्या गावाकडे वर्षातून आठ ते दहा चकरा होतात. कातकरी जमातीतील आदिवासी जास्त काळ परगावी मुक्काम करतात. त्यांच्या स्थलांतराचा काळ २ महिने ते ८ महिने असतो. या जमातीतील लोक वर्षातून तीन ते चार वेळा गावाकडे येतात. आदिवासींना त्यांच्या भागात जेवढी मजुरी मिळते त्यापेक्षा दीडपट ते दुप्पट मजुरी स्थलांतर केलेल्या ठिकाणी मिळते. परगावी आदिवासींना विविध मार्गांनी कामे मिळतात. काही आदिवासी स्वत:हून काम शोधण्यासाठी परगावी जातात. तर परगावचे ठेकेदार, मोठे शेतकरी आदिवासी भागात येऊन आदिवासींना कामासाठी घेऊन जातात. परगावी आदिवासींना उन्हाळी व पावसाळी भाताची लागवड, कापणी, मळणी, दगड फोडणे, फाटे फोडणे, गवत कापणे, वीटभट्टीवर काम करणे, खाडीतून वाळू उपसणे अशा प्रकाराची शेतीची व बिगरशेतीची कामे करावी लागतात. आदिवासींच्या स्थलांतराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आदिवासी जरी दरवर्षी स्थलांतर करत असले तरी दरवर्षी ते एकाच मालकाकडे किंवा एकाच गावी जात नाहीत. हजारात एखादा मालक चांगला असतो. त्यांच्याकडे आदिवासी पुन्हा म्हणजे पुढच्या वर्षी कामाला जातात. बहसुंख्य आदिवासींना मालकाचे नाव माहित नसते. मालकांना ते शेठ असे म्हणतात.

### ५.८ आदिवासींच्या स्थलांतराची कारणे

अभ्यासक्षेत्रातील आदिवासींच्या स्थलांतरास कारणीभूत असणाऱ्या काही घटकांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

मोखाडा तालुक्यातील शेती संपूर्णपणे कोरडवाहू असल्याने शेतीत जेमतेम एक ते दोन महिनेच रोजगार मिळतो. त्यामुळे आदिवासींना परगावी स्थलांतर करावे लागते. भूमिहीन आदिवासींमध्ये स्थलांतराचे प्रमाण खूप मोठे आहे. कारण स्वत:ची शेती नसल्यामुळे आपल्या भागातील शेतीची कामे आटोपली की, उदरनिर्वाहासाठी त्यांना स्थलांतर करावे लागते. दारिद्र्य व बेरोजगारी निर्मूलनासाठी सरकार आदिवासी भागात विविध रोजगार योजना राबवत असले तरी या योजनेत काही दोष आहेत. उदाहरणार्थ कामे लवकर संपणे, एक काम संपले की दुसरे काम सुरू होण्यास आठ ते दहा दिवसांपेक्षा जास्त विलंब लावणे इ. यामुळे आदिवासी परगावी कामासाठी जाणे पसंत करतात. बहुसंख्य आदिवासी कुटुंबांचा आकार मोठा असल्याने स्थानिक भागात उपलब्ध असलेल्या उदरनिर्वाहाच्या साधनावर सर्वांची उपजीविका होत नाही. त्यामुळे परगावी कामासाठी जावे लागते. आदिवासी शेतकऱ्यांमध्ये लहान आणि सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण खूप मोठे असून शेतीतील उत्पादन त्यांना दोन ते चार महिने सुद्धा पुरत नाही. त्यामुळे त्यांना स्थलांतर करावे लागते. आदिवासींना त्यांच्या स्थानिक भागात जेवढी मजुरी मिळते त्यापेक्षा अधिक मजुरी परगावी मिळते. त्यामुळे सुद्धा आदिवासी स्थलांतर करतात. अन्न टंचाईच्या काळात गरीब आदिवासींना सधन आदिवासींकडून धान्य व पैसे कर्जाऊ मिळतात. परंतु त्याची परतफेड सव्वापट ते दीडपट करावी लागते. अशा प्रकारे चढ्या व्याजाने कर्ज घेण्यापेक्षा काही दिवस परगावी कामाला जाऊन राहण्यास पर्याय काही आदिवासी निवडतात.

### ५.९ स्थलांतराचे परिणाम

स्थलांतरामुळे आदिवासींना काही फायदे होतात. तसेच स्थलांतरामुळे काही समस्याही निर्माण होतात असे अभ्यासात आढळून आले. त्याचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

### ५.९.१ स्थलांतराचे अनुकूल परिणाम

आदिवासी परगावी जेवढे दिवस स्थलांतर करतात तेवढे दिवस उपासमारीचा काळ कमी होतो. आदिवासींना त्यांच्या स्थानिक भागात जेवढी मजुरी मिळते त्यापेक्षा अधिक मजुरी त्यांना परगावी मिळते. परगावी कामासाठी स्थलांतर केल्याने काही दिवस पोटापाण्याची सोय होते. त्यामुळे उपभोगाचे कर्ज फारसे घ्यावे लागत नाही. अन्नाबरोबरच काही आदिवासींची कपड्यांचीही गरज भागते. परगावी जे जादा उत्पन्न मिळते त्यातून थोडे फार कपडे विकत घेता येतात, असे आदिवासींनी मुलाखतीत सांगितले.

### ५.९.२ स्थलांतराचे दुष्परिणाम / समस्या / वाईट अनुभव

परगावी पोटापाण्यासाठी स्थलांतर करणाऱ्या आदिवासींना अनेक वाईट अनुभव येतात. विविध समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते. जे आदिवासी कोणाच्याही मदतीशिवाय परगावी कामासाठी स्थलांतर करतात त्यांना ताबडतोब काम मिळत नाही. त्यामुळे काम मिळेपर्यंत परगावी त्यांची उपासमार होते. बिगरशेतीची कामे करणाऱ्या बहुसंख्य आदिवासींना रस्त्याच्या कडेला, जंगलात, मोरीत, स्मशानभूमीत, झाडाखाली रहावे लागते. अवेळी किंवा वळवाचा पाऊस

पडला की आदिवासींचे खूप हाल होतात. शेतीची कामे करणाऱ्या आदिवासी मजुरांना त्यांच्या शेतमालकाकडून दिवसातून तीन वेळा शिजवलेले अन्न दिले जाते. परंतु हे जेवण अपुरे व निकृष्ट दर्जाचे असते. परगावी पिण्याचे स्वच्छ पाणी मिळत नाही. त्यामुळे हगवण, थंडी-ताप इ. आजार उद्भवतात. बिगरशेतीची कामे करणाऱ्या आदिवासींना चार ते आठ दिवसांतून एकदाच आंघोळीसाठी पाणी मिळते. तेही अपुरे असते. त्यामुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. परगावी बहुसंख्य आदिवासींची त्यांच्या मालकाकडून फसवणूक होते. ठरलेल्या मजुरीपेक्षा कमी मजुरी आदिवासींना दिली जाते. बहुसंख्य मालक अपशब्द वापरून किंवा शिवीगाळ करून आदिवासींची सतत मानहानी करतात. परगावी काही आदिवासींच्या वाट्याला गुलामीचे जिणे येते. काम निभत नसेल किंवा सण, लग्न इ. साठी गावी जायचे असेल तर काही मालक परवानगी देत नाहीत. तसेच झालेल्या कामाचे पैसेही देत नाहीत.

जे आदिवासी बिगरशेतीची कामे करतात त्यांची कामे शेतमजुरांच्या तुलनेत कष्टाची व मेहनतीची असतात. खाणीत दगड फोडणे, समुद्राच्या खाडीत बुडी मारून रेती काढणे इत्यादी कामे कष्टाची व मेहनतीची असतात. परगावी स्थलांतर करणाऱ्या आदिवासींना त्यांच्या मालकाकडून कोणत्याही आरोग्यविषयक सुविधा पुरविल्या जात नाहीत. किरकोळ आजाराचा खर्चसुद्धा मालक करत नाही. स्थलांतर करणाऱ्या कुटुंबप्रमुखांचे मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. तसेच मुले १६ ते १७ वर्षांची झाली की त्यांचे शिक्षण बंद करून त्यांना परगावी कामासाठी नेले जाते. त्यामुळे गळतीचा प्रश्न निर्माण होतो. जे आदिवासी दरवर्षी आपल्या संपूर्ण कुटुंबातील स्थलांतर करतात त्यांच्या मुला-बाळांना शाळेचे तोंडही पहायला मिळत नाही. परगावी हातभट्टीची किंवा गावठी दारू सहज उपलब्ध होत असल्याने व्यसनाधिन आदिवासी अधिकच व्यसनाधिन बनतात. तसेच जे आदिवासी आपल्या संपूर्ण कुटुंबासहित परगावी स्थलांतर करतात त्यांना गावाकडे शासन राबवत असलेल्या काही सोयी सुविधांपासून वंचित रहावे लागते.

### ५.१० आदिवासींच्या स्थलांतरासंदर्भात शिफारशी

स्थलांतरामुळे आदिवासींना काही फायदे मिळत असले तरी परगावी अनेक समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते. म्हणून आदिवासींचे स्थलांतर रोखले पाहिजे. त्यांना त्यांच्या भागातच अधिक चांगले जीवन जगता आले पाहिजे. आदिवासींचे स्थलांतर रोखण्यासाठी आणि स्थलांतराच्या ठिकाणी आदिवासींना भोगाव्या लागणाऱ्या हाल अपेष्टा कमी व्हाव्यात यासाठी काही शिफारशी खालीलप्रमाणे सुचविल्या आहेत.

**१. दारीद्र्याचे उच्चाटन**

दारिद्र्यामुळेच आदिवासींना आपले घर-दार सोडून परगावी कामाच्या शोधात फिरावे लागते. म्हणून स्थलांतर रोखण्यासाठी सरकारने दारिद्र्याचे उच्चाटन केले पाहिजे.

**२. स्थानिक भागात रोजगार संधी उपलब्ध करून देणे**

सरकारने आदिवासींना त्यांच्या परिसरात पुरेसा रोजगार उपलब्ध करून दिल्यास त्यांच्यावर स्थलांतराची पाळी येणार नाही.

**३. निवारा केंद्राची स्थापना**

परगावी आदिवासींना गलिच्छ आणि वाईट वातावरणात रहावे लागते. त्यांना अशा प्रकारचे जीवन

(पृष्ठ क्र. ४२ वर पहा)

# आदिवासी दलितांसारखा लढाऊ का नाही ?

प्रा. डॉ. मोतीराम रावजी देशमुख

भारतात भौगोलिक भिन्नता, धर्मवंश भिन्नतेमुळे सामाजिक प्रश्नांतही भिन्नता आढळते. भारतातील बहुसंख्य समाज हा धर्मभेद, जातीभेद, वंशभेद, स्पृश्य-अस्पृश्य अशा सामाजिकता निर्माण करणाऱ्या तत्त्वावर विभागलेला आहे. सामाजिक परिवर्तनामुळे त्यांच्या बदलाला गती मिळाली असली तरी त्याला मात्र योग्य दिशा मिळू शकलेली नाही. या परिवर्तनात, प्रगतीच्या प्रवाहात आदिवासी, दलित समाजाला प्राधान्याने सहभागी करुन घेणे गरजेचे आहे.

दलित हा अस्पृश्य म्हणून उपेक्षित राहिला आहे. परंतु तो अधिक लोकसंख्या आणि दाट लोकवस्तीने वास्तव्य करुन राहणारा समाज आहे. आदिवासी हा दूरवर डोंगर-दऱ्यांच्या आश्रयाने राहणारा, संपर्काचा अभाव, दळणवळणाच्या सुविधांचा अभाव आणि विरळ लोकवस्तीचा समाज आहे. तो दुर्बल घटकांपैकी सर्वाधिक उपेक्षित असलेला समाज आहे. मात्र या दोनही उपेक्षित समाजांच्या समस्येचे स्वरुप विविध स्वरुपाचे आहे.

ब्रिटिश राजवटीत राज्यकर्त्यांना आदिवासींच्या समाजजीवनाचा सर्वप्रथम अभ्यास करुन त्यांच्या प्रश्नांचा ऊहापोह केला. सर्वे केला; परंतु प्रत्यक्ष कृतीला मात्र मर्यादित स्वरुपात ठेवले होते. दळणवळणाच्या साधनांचा अभाव, सेवा-सुविधांचा अभाव, अज्ञान आणि राजकीय जागृतीचा अभाव यामुळे हा समाज त्या काळातही मुख्य प्रवाहातून बाजूला राहिला. शिवाय कायद्याने मागचे दार सताड उघडे ठेवल्यामुळे मिशनरी ठेकेदार, व्यापारी आणि सावकार यांनी आदिवासी भागात हैदोस घालून त्यांचे आर्थिक, सामाजिक शोषण आपापल्या परीने सुरु ठेवल्याने तो अधिकाधिक दबतच गेला. त्याला साऱ्यांनी मिळून सर्व बाजूंनी आपापल्या परीने दाबूनच ठेवले.

आदिवासी समाजाची निराळी; पण स्वतंत्र अशी जीवन रहाटी आहे. आपण सर्वांनी मिळून सहविचाराने मागासलेपणाचा शिक्का त्यांच्या कपाळावर मारला, त्या आदिवासी समाजाचे मागासलेपण हे हिंदू समाजातील कनिष्ठ स्थराच्या दलितांपेक्षा अगदीच भिन्न आहे. हजारो वर्षांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक दडपणामुळे, वर्णभेद, जातीभेदामुळे त्यांना प्रगतीचा प्रकाश दिसला नाही. त्या काळातील सामाजिक व्यवस्थेमुळे दलित वर्ग सामाजिक आणि आर्थिक जीवनात मागे राहिला.

विषमतेच्या भिंती मोडून पडल्याशिवाय शिक्षणाची संधी मिळाल्याशिवाय हा समाज सुधारणार नाही. या विचारानेच त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी त्यांच्यात बंडाची ताकद निर्माण करण्यासाठी, त्यांच्या उध्दारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या प्रश्नांचा अभ्यास करुन

त्यांच्या दु:खाचे एक जिवंत चित्र भारतीय जनतेसमोर मांडले. त्याला साजेशी अशी तत्त्वज्ञानाची स्वतंत्र बैठकही त्यांनी निर्माण केली. त्याला अनुसरुनच पुढे त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी उपाययोजना अंमलात आली. त्यावेळी आदिवासींच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठीही तशीच उपाययोजना अंमलात आणली. परंतु आदिवासींचे प्रश्न, त्यांची दु:खे वेगळी असल्याने तो उपाय त्यांच्यासाठी निरर्थक ठरला. कुचकामी ठरला.

याविषयी आपले मत मांडताना आदिवासी साहित्याचे संशोधक डॉ. गोविंद गारे म्हणतात. ''आंबेडकरांसारखे सामाजिक, राजकीय, डोळस नेतृत्व या समाजाकडून निर्माण झाले नाही हे या समाजाचे दुर्दैव. मात्र आदिवासींच्या विकासासाठी, उद्धारासाठी कोणीच प्रयत्न केले नाहीत असे मात्र मुळीच नाही. नामदार गोखले, महात्मा गांधी, ठक्कर बाप्पा, भाऊसाहेब हिरे, आचार्य भिसे इत्यादींनी आदिवासी समाजाची सेवा केली. पण त्यात उपकाराची, सेवेची, संतपणाची भावनाच अधिक दिसून येत होती. सामाजिक व आर्थिक क्षेत्रात आदिवासींवर होत असलेल्या अत्याचाराचा प्रतिकार करण्याची चाहूल त्यांच्यात दिसून येत नव्हती; किंबहुना अन्यायाची चीड या समाज सेवकांना नव्हती.'' डॉ. गोविंद गारे यांनी तत्कालीन वास्तवता यातून व्यक्त केली आहे.

आदिवासी जनजातींच्या सेवेसाठी, उद्धारासाठी महात्मा गांधीनी आपल्या अनुयायांना 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला. यामुळे खरे पाहता आदिवासींनी सुटकेचा नि:श्वास सोडला. आता आपले प्रश्न सुटतील अशी स्वप्नेही त्यांनी पाहिली. पण त्यांच्या अनुयायांतील बुद्धीवादाचा, बौद्धिक नेतृत्वाचा आणि संघशक्तीचा अभाव आणि विशेष म्हणजे त्यांना मिळालेल्या प्रेरणेच्या उगमस्थानातील गांधीजींचे भूतद्यावादी तत्वज्ञान आणि त्यांचा वरपांगी दृष्टिकोन यामुळे ते आदिवासींशी समरस होऊ शकले नाही. येथेच खेड्यांचा विकासाचे गांधीजींचे तत्त्वज्ञान फोल ठरले आणि पुन्हा एकदा आदिवासींच्या वाट्याला निराशा आली.

त्याऐवजी या समाजाला स्वातंत्र्य संग्रामात ब्रिटिशांविरुद्ध बंड करण्यासाठी असहकार चळवळीसाठी जसे संघटित केले, त्यांचा वापर करुन घेतला तसेच या समाजाला त्यांच्यावर होणारा अन्याय, अत्याचार निपटून काढण्यासाठी, त्यांच्या न्याय-हक्कांसाठी जागृत केले असते आणि त्यांना 'शहराकडे चला' असा शुभसंदेश दिला असता तर कदाचित स्वातंत्र्याच्या एकसष्ठीत 'अंगठा' पुढे करण्याची, अर्धपोटी आणि लंगोटीवर राहण्याची वेळ त्यांच्यावर आज तरी आली नसती. आजही दारिद्र्य रेषेखालील लोकांची दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या म्हणजेच शासनाची आज ठरु पाहणारी डोकेदुखी या आधीच बऱ्यापैकी दूर झाली असतील.

स्वातंत्र्याआधी गांधीवादी अनुयायांनी आदिवासींना समजून घेतले नाही. एका अर्थाने आपलेसे मानले नाही. स्वातंत्र्यानंतर शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांना समजून घेतले नाही. ब्रिटिश काळात सावकारांनी त्यांचे आर्थिक शोषण केले, तर स्वातंत्र्यानंतर तोच धागा पकडून शासकीय अधिकारी, कर्मचारी, व्यापाऱ्यांनी, मालक आणि मुकादमांनी तीच आर्थिक शोषणाची परंपरा पुढे अव्याहतपणे सुरु ठेवली. पर्यायाने आधीच फाटका असलेला आदिवासी अधिकच फाटका बनत गेला.

या प्रकारामुळे आजवर अनेक आदिवासी संपले आहेत. शासनाने त्यांच्या विकासासाठी आजवर राबविलेल्या नानाविध योजनांवरती पाण्यासारखा पैसा खर्च केला आहे; परंतु प्रत्यक्षात त्याचा फायदा मात्र सत्य हाती असलेल्या लोकांनी आपल्या नात्यागोत्याच्या घरापुरताच करुन घेतला. वेळप्रसंगी दुसऱ्यांच्याही नावावरील योजना त्यांनीच लाटल्या. यामुळे शासकीय दरबारी अनेक लाभधारक दिसत असले तरी वस्तुस्थिती मात्र निराळीच आहे.

एवढे सारे विस्ताराने मांडण्याचे तात्पर्य एवढेच की, ब्रिटिशांपासून तर आजवर अनेकांनी आदिवासींचे आर्थिक, शारीरिक आणि मानसिक शोषण केले. आता मात्र पुढारलेल्या आदिवासींकडून सर्वसामान्य आदिवासींचे शोषण सुरु आहे. या साऱ्यांनी त्यांच्यावर वेळोवेळी अन्याय, अत्याचार आणि छळही केला. एवढे सारे घडत असतानाही हा समाज शांत आहे. बौद्धिक जागृती, बुद्धीवादी नेतृत्व, संघशक्ती किंवा समाजाच्या अव्यक्त शक्तीचा अभाव, राजकीय जागृती नसतानाही राजकीय हक्क मिळाले. विशिष्ट पक्षांनी 'होयबा' उमेद्वार निवडून आणून केवळ आपल्या पक्षाचे हित पाहिले. आदिवासींच्या समस्यांना वाचा फोडणारे दलितांसारखे लढाऊ बाण्याचे कार्यकर्ते समाजात आजवर निर्माण झालेले नाहीत. राज्यपातळीवर साऱ्यांना एकत्रित करुन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून सच्चे नेतृत्व करणारा एकही नेता आजपर्यंत निर्माण होऊ शकला नाही. ही सारी कारणे आदिवासींच्या प्रगतीला अडथळा निर्माण करणारी आहेत.

आजवरच्या हजारो पिढ्या गरिबी, दु:खातच खितपत असतानाही हा समाज अन्याय, अत्याचार, छळ, न्याय-हक्कांसाठी, सत्यासाठी संघटित होऊ शकला नाही. तो त्याविरुद्ध आवाज उठवू शकला नाही. याला वरीलपेक्षा काही वेगळीही कारणे आहेत आणि ती त्यांच्या संस्कृतीमधीलच आहेत.

वास्तविकत: आदिवासी आज शिकू लागला आहे. त्यांची लोकसंख्याही वाढली आहे. परंतु आदिवासी संस्कृती ही श्रध्दाळू, खात्या मिठाला जागणारी, दिला शब्द पाळणारी, थोरामोठ्यांचा मान राखणारी, आपल्या पायरीने वागणारी, अतिसहनशील आणि भूतदयावादी असल्याने दु:ख, अन्याय, अत्याचार, छळ, गरिबी, कष्टमय जीवन हा स्वत:च्या वाट्याला आलेला पूर्वजन्मीचा भोग समजून मुकाट्याने सहन करणारी आहे. यामुळेच रानवाऱ्याबरोबर मैलोन्‌मैल पाऊलवाटा तुडवीत डोंगरदऱ्यांतील कडेकपारीतून रानावनात शिकार, कंदमुळांसाठी भटकंती करणारा वेळप्रसंगी वाघासारख शूरवीर, पराक्रमी आदिवासी दलितांसारखा संघटित होऊ शकला नाही. लढाऊ बनू शकला नाही. आदिवासी संस्कृतीच्या या आगळ्या-वेगळ्या तऱ्हेमुळेच तो दुबळा बनला. यासाठीच त्यांना त्यांच्या अजानतेपणाची, अस्मितेची आणि त्यांच्या गत इतिहासाचीही जाणीव करुन देणे गरजेचे आहे. आपण कोठे आहोत ? कोठे जायचे आहे ? याची त्यांना जाणीव करुन दिल्यास नक्कीच त्यांच्यात आत्मभान येईल. पर्यायाने तो प्रगतीच्या, प्रवाहाच्या दिशेने वाटचाल करु शकेल.

प्राचार्य, कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, हरसूल

• • •

# कर्मवीर दादासाहेब यांच्या सहवासातील एक तप

**ना. सी. पाटील, नाशिक**

धुळे येथील मा. काकासाहेब बर्वे यांचे पत्रामुळे मला डांग सेवा मंडळात काम करण्याची संधी मिळाली. नोव्हेंबरअखेर १९५२ मध्ये डांग सेवा मंडळाच्या कार्यालयाचा शोध घेत शरणपूर रोडच्या कार्यालयात गेलो. तेथे हिशोबनीस राम ओतुरकर यांनी माझी चौकशी केली आणि दोन दिवस थांबण्याचा सल्ला दिला. दादाबाहेब बिडकर हे मुंबई येथे गेले आहे. ते आमदार आहेत म्हणून त्यांना मुंबई येथे जावे लागते, असे मला सांगितले. माझी गैरसोय पाहून त्यांनीच माझी मंडळात निवासाची आणि जेवणाची सोय केली. दादासाहेब मुंबईवरुन आल्यावर त्यांचेपुढे मला उभे केले आणि माझी शिफारस त्यांनीच केली आणि मला कळवण येथे महात्मा गांधी विद्यार्थी वसतिगृहाचा अधीक्षक म्हणून १ डिसेंबर १९५२ रोजी पाठविले. डिसेंबर ते एप्रिल काळात (१९५२-५३) अधिक्षक म्हणून नेमणूक केली. त्या काळात समाज कल्याण अधिकारी साळुंखे, डांग सेवा मंडळाचे संघटक पंडीत धर्मा पाटील, दादासाहेब बिडकर, राम ओतुरकर, बळवंतराव अग्निहोत्री येऊन गेले. या काळात २६ जानेवारी १९५३ ला क्रांती नावाने हस्तलिखित आम्ही सुरु केले. या हस्तलिखित ताज्या उदघाटनाच्या निमित्ताने कळवणचे न्यायाधीश सापत्नेकर वसतिगृहात आले. त्यांचे हस्ते अंकाचे उद्घाटन केले. हस्तलिखित संपादक म्हणून इ. ७ वी चा विद्यार्थी अर्जुन तुळशीराम पवार (दळवट) हा सुंदर हस्ताक्षरामुळे काम पाहात होता. त्याचे वडील तुळशीराम पवार दळवटवरुन कळवण येथे १५ ते १६ मैल पायी या मुलास भेटण्यासाठी यावयाचे. मुलांवर प्रेम करणारा 'गुरुजी मुलांना चांगले सांभाळा त्यांचा अभ्यास घ्या आणि चांगले शिकवा' असे सांगून जात होते. माझ्या ६ महिन्यांचे समाधानकारक कामामुळे माझी बदली मोठ्या वसतिगृहावर अभोणे येथे जून १९५३ पासून झाली. अभोणे येथे भालचंद्र सोनवणे मला सहकारी लाभले. त्यांचे प्रयत्नामुळे सांस्कृतिक कार्यक्रमाची वसतिगृहाची घडी बसली. मा. दादासाहेब बिडकर नेहमी यावयाचे. त्यांनी काम पाहून राष्ट्रसेवा दलाचे ३०० मुलांचे शिबीर आयोजित केले. मार्गदर्शनासाठी हरिभाऊ हाबडे आणि यदुनाथ थत्ते आले. त्यांचे प्रभावी वक्तव्य आणि सेवादल गाण्यांमुळे ७ दिवसांचे शिबीराचा खर्च अभोणे ग्रामस्थांनी स्वत:हून धान्य, दाळी, किराणा आणि काही आर्थिक मदत देऊन उभा केला. अधीक्षक म्हणून काम करताना दुपारचा वेळ मी हिंदी विषयाचे अभ्यासासाठी उपयोगी आणला. मात्र पुन्हा १६ महिन्यांनी मला उंबरठाण आश्रमशाळेवर गृहपती म्हणून पाठविले आणि शाळा निर्माण करण्यासाठी उंबरठाण, ता. सुरगाणे येथे असे दुर्गम भागात जावे लागले.

**मुंबई राज्याची पहिली आश्रमशाळा** – उंबरठाण, ता. सुरगाणे, जि. नाशिक

राज्यात यावेळी ५ आश्रम शाळा मंजूर झाल्या. त्यापैकी उंबरठाण येथे जून १९५४ पासूनच आश्रम शाळा मंजूर झाली.

तथापि अत्यंत दुर्गम परिसर तेथे जाण्यास कोणी

तयार होत नव्हते, त्यामुळे जून ते सप्टेंबर कार्यकर्ता शोधण्यातच संस्थेचा वेळ गेला. तथापि मधुकर म्हैसने, संघटक गांधी स्मारक निधी बोरगांव यांचे सल्ल्याने आम्ही जाण्याची तयारी केली. त्यावेळी एस. टी. किंवा हाफटन पावसाळ्यामुळे पांडाणेपर्यंत जात होती. तेथील नाल्यास पूर असावयाचा. पूर कमी झाल्यावर पुढे पायी प्रवास. घोडा अगर बैलगाडी या शिवाय साधने नव्हती. एकदाचा आमचाही पायी प्रवास सुरु झाला आणि धागबारी मार्गे बोरगांव गाठले. तेथे आमचे मित्र मधुकर म्हैसने, वसतिगृह अधिक्षक उत्तम गिरी, संघटक न. ह. पाटील यामुळे जरा दिलासा मिळाला. दुसरे दिवशी मधुकर म्हैसने आणि तेथील प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नाना गुरुजी यांचेबरोबर सुरगाणे गाठले. या १२ मैलाचे प्रवासामुळे सुरगाणे येथे मुक्काम केला. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकर कुलकर्णी यांनी आमची भोजन व निवासाची व्यवस्था केली. माध्यमिक विद्यालय आदिवासी सेवा समितीने नुकतेच सुरु केले, तेथील गायकवाड सर यांना भेटलो. त्यांनाही आश्रम शाळेचे कल्पनेमुळे बरे वाटले. त्यामुळे संपर्क अधिक वाढला आणि पुढील काही प्रश्न सुटत गेले.

**उंबरठाणचा असा प्रवास :**

बैलगाडीचा रस्ता टाळून डोंगर चढून शॉर्ट कट शोधीत आम्ही २ ऑक्टोबर १९५४ रोजी उंबरठाण येथे पोहोचलो. दोन किराणा दुकाने, १ पोलिस व १ फॉरिस्टर एवढाच सुशिक्षित वर्ग, बाकी सर्व आदिवासींचे गाव. मराठी शाळा ४ थी पर्यंत. तेथेच व्हरांड्यावर आम्ही हाताने स्वयंपाक करुन भोजन घेतले आणि रात्री जि. प. प्राथमिक शाळेत झोपलो.

**मधुकर म्हैसने यांचा सल्ला :**

सकाळी शाळा सुरु झाली. शनिवार बाजार म्हणून सकाळची शाळा होती. या बाजाराला धरमपूर, वघई, वाजदा, सुरगाणे येथून व्यापारी बैलगाडी आणि घोड्यावर साहित्य सामानासह आले होते. त्यांनी दुकाने लावली. नागली, तांदूळ, वांगे, मिरच्या, बोंबील, शेव पापडी, भजे, फुटाणे, दाळ्यांच्या बाजारात फिरलो. काही मराठी आणि काही गुजराथी आणि काही आदिवासी मिश्रीत भाषा यामुळे आम्हाला कुतुहल वाटले. मधुकर म्हैसने आमचेपेक्षा जरा विचाराने परिपक्व आणि वसंतराव नागोलकर यांचेकडे काही काळ राहिलेले. वयानेही जरा मोठेच ! त्यांनी मला सांगितले की, ''भाऊ तू ५ वर्षे उंबरठाण येथे काढ म्हणजे तुझ्या जीवनाचे सोने होईल.'' गांधीजी म्हणत होते की, खऱ्या भारताचे दर्शन ग्रामीण भागातच होते. नाना मास्तर आणि मधुकर म्हैसने यांनी बाजार पाहिला आणि सकाळी ११ नंतर सुरगाणे मार्गाने पायीच गेले. मी त्यांचे सूचनेवर विचार करु लागलो. बाजारात गरम भजे खावून तृप्त झालो. धूम गुरुजी, फॉरेस्टर पोलीस यांचेशी संपर्क साधला. त्यांनी धीर दिला. मला जरे बरे वाटले.

**विधायक वृत्तीचा व्यापारी जगनशेठ सूर्यवंशी यांचा आधार :**

दुसऱ्या दिवशी रविवारी जगनशेट सूर्यवंशी यांना भेटलो. धूम गुरुजी आणि मी एकत्र राहून स्वयंपाक करु लागलो. जगनशेट हे विचारी गृहस्थ वाटले. गोरखपूरचे कल्याण नावाचे मासिक सतत वाचावयाचे आणि आयुर्वेदिक औषधे आदिवासींना मोफत द्यावयाचे.

''खानेवाले का नाम दाने दाने पर लिखा है'' असे म्हणून जेवणाचा आग्रह करावयाचे. वेळ पास करण्यासाठी नव्हे तर त्यांचे सल्ल्याने आश्रमशाळा कशी सुरु करता येईल यासंबंधी मी त्यांचेशी जास्त विचार आणि चर्चा करीत राहणे हे माझे काम होऊन बसले होते. त्यांचा प्रथम विश्वास संपादन केला. त्यांच्या किराणा दुकानामुळे आर्थिक व्यवहारही व्यवस्थित केले. त्यामुळे त्यांचा विश्वासू सहकारी मी बनलो.

**प्रथम पर्णकुटी आणि नियोजित इमारत :**

याच काळात दादासाहेब बिडकर आणि संस्था सेक्रेटरी येऊन गेले. श्री. दादासाहेब बिडकर अत्यंत प्रभावी कार्यकर्ते होते. सावकार आणि अधिकारी त्यांना वचकत होते. स्वातंत्र्य सैनिक आणि आदिवासींचे कैवारी म्हणून त्यांची ख्याती सर्व जिल्ह्यात होती. सुरगाणे संस्थान स्वातंत्र्यात विलीन करावे म्हणून त्यांचा पुढाकार होता. त्यामुळे जगनशेटही त्यांना दादा मानत होते. जगनशेटचे एक पडकी पर्णकुटी संस्थानचे कारवीचे गोडावून दुरुस्त करावयास सांगून तेथे आश्रमशाळा सुरु करावी असा सल्ला दिला. ४५ रुपये मजुरी देवून हे गोडावून दुरुस्त केले आणि स्थैर्य मिळविले. श्री. शेख नावाचे पोलीस यांनी चांगले सहकार्य केले. त्यांचे बरोबर मी १२ दिवस फिरुन १५ मुले लंगोटी लावलेले आणि ४ मुली अंगवस्त्र झाकणाऱ्या कशा तरी मिळविल्या आणि या गोडावूनचे पर्णकुटीत आश्रमशाळा दि. १६ ऑक्टोबर १९५४ रोजी सुरु केली. वसतीगृह नियोजन आणि शाळा मुख्याध्यापक प्रथम सहा महिने मलाच काम करावे लागले. तातडीने बाळासाहेब अग्निहोत्री, सेक्रेटरी दिवाळीपूर्वी आले. मालट्रकचे वाहतुकीमुळे थोडे रस्ते दुरुस्त झाले होते. त्या परिस्थितीत संस्थेचे जीपने उंबरठाण येथे पोहचले. पर्णकुटी आणि मुलांची स्वच्छता पाठीमागील काजुचे झाडास खिळे ठोकून लटकवलेली प्रातः विधीसाठी टमरेल बघून त्यांना फार समाधान वाटले. गुजराथी कार्यकर्ते प्रवीणभाई देखील अचानक येऊन गेले. सदर प्रयोग आणि स्वच्छता पाहून आश्रम शाळेचे कायमचे सहकारी बनले. प्रवीणभाई यांचे मार्गदर्शनही मोलाचे वाटले.

आश्रमशाळा सुरु करताना मी मात्र सहकारी नियम धाब्यावर बसवून १ ते ४ वर्गातील विद्यार्थी निवडले. याकामी स्थानिक पातळीवर डुल्या देशमुख, चंद्रा भगत, धवळू सहारे, अनाजी पाटील, रेवजी पाटील, रतन पवार, देवाजी चौधरी आणि शेख पोलिस यांचे चांगले सहकार्य मिळाले. जानेवारी १९५४ मध्ये शिक्षणाधिकारी सेवलेकर, बाळासाहेब अग्निहोत्री आणि डेप्युटी डायरेक्टर चौधरी जीपने आले. त्यांनी परिस्थितीचे अवलोकन करुन सुरु केलेल्या कार्यामुळे समाधान व्यक्त केले. एवढेच नव्हे तर मी फक्त मॅट्रिक पास असताना मला ओरिजनल ट्रेंड म्हणून सन्मानित केले. त्यामुळे मी मन लावून काम करु लागलो. मात्र जगनशेट सूर्यवंशी हेच माझे खरे सल्लागार, त्यामुळे नियोजित इमारत जागा आणि शाळेसाठी शेती मिळविण्यासाठी विचार करु लागलो आणि या कामात पूर्ण रममाण झालो. (क्रमशः)

**ना. सी. पाटील**
आदिवासी सेवक, नाशिक

• • •

# ग्रामीण विकासात जात पंचायतीची भूमिका

**प्रा. साधना बी. जावळ**

जात पंचायत ही प्रत्येक जातीच्या संदर्भात एक महत्त्वपूर्ण बाब असून जातीच्या संदर्भात ती उल्लेखनीय कार्य करीत असते. जात पंचायत म्हणजे एखाद्या जातीतील आपापसातील संघर्ष व समस्या सोडविण्यासाठी निर्माण केलेली निस्वार्थी व मान्यवर व्यक्तींची समिती होय. या पंचायतीचे सदस्य त्या त्या जातीतून निवडले जातात. आपल्या जातीवरील निष्ठा कायम ठेवणे व जातीच्या हिताचे रक्षण करणे, जातीतील वाद मिटविणे हे जातपंचायतीचे कार्य होय.

प्रत्येक जातीला परंपरागत अशी विशिष्ट आचार पद्धती असते व ती पाळली जाते किंवा नाही, हे पाहण्याचे काम जातीतील वृद्ध व आदरणीय व्यक्ती आणि जात पंचायतीकडे असते. जाती समाजातील प्रबोधनात्मक व विकासात्मक कार्य करीत असतात. जेव्हा व्यक्तीच्या समस्या व्यक्तिगत पातळीवर, कौटुंबिक पातळीवर सोडविल्या जात नसतात, तेव्हा पंचायतीची मदत घेऊन त्या सोडविल्या जातात. व्यक्तीला वाममार्गापासून बचावणे, व्यक्तीने केलेल्या गुन्ह्यावर तोडगा काढणे याबाबत जात पंचायत निर्णय देण्याचे कार्य करीत असते. त्यामुळे जात पंचायतीच्या सदस्यांवर नियंत्रण ठेवले जाऊन परंपरेच्या बाहेर वर्तन करणाऱ्या व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवले जाते.

काही जातीत पंचायत प्रमुखाची समारंभपूर्वक निवड करतात व त्यास नियमित काम करावे लागते. तर बहुतांश जातीत पंचायतीचे काम अनौपचारिकरित्या चालते. जाती पंचायतीचे स्वरूप अनौपचारिक असले तरी त्या जाती क्षेत्रात अत्यंत प्रभावी असतात. व्यक्तीच्या संपूर्ण जीवनावर जातीचे नियंत्रण असते. त्यामुळे समुदाय नियंत्रणापेक्षा व्यक्तीला जाती नियंत्रण महत्त्वाचे वाटते. ग्रामीण भागात जातीच्या बंधनाचे सहसा कुणी उल्लंघन करीत नाही. आज प्रत्येक जातीची मंडळे अस्तित्त्वात आहेत. ही मंडळे स्वजातीच्या हिताचे रक्षण करण्याबरोबरच समाज विकास व सुधारणेचे महत्त्वपूर्ण कार्य करतात.

**भोरगाव लेवा पंचायत**

महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात लेवा पाटीदार या जातीचे वास्तव्य अधिक आहे. जिल्ह्यातील यावल, रावेर, भुसावळ आणि जळगाव या तालुक्यात प्रामुख्याने लेवा पाटीदार जातीच्या लोकांची वस्ती आहे. लेवा पाटीदार समाजात पाडळसा येथे भोरगाव लेवा पंचायत आहे.

जळगाव जिल्ह्यातील पाडळसा हे गाव यावल तालुक्यात आहे. जळगाव जिल्ह्यातील लेवा पाटीदारांची वस्ती असणाऱ्या गावांच्या मध्यभागी पाडळसे हे गाव असल्याने जाती पंचायतीसाठी निवडण्याचा हेतू असावा. बारा पंचक्रोशीतील गावाची पंचायत म्हणजे भोरगाव पंचायत होय असे म्हटले जाते. या पंचायतीचा लेवा पाटीदार जातीत मोठा वचक व प्रभाव होता. विवाहविषयक सोडचिठ्ठी, भाऊबंदकी याविषयीची वाद या पंचायतीत सोडविले जात असत. पाडळसे व भोरटेक यांच्या जवळून वाहणाऱ्या मोर नदीच्या वाळवंटात वर्षात एकदाच ही पंचायत बोलविली जात असे.

भोरगाव पंचायत व्यक्तिविकासाबरोबर समाज विकासाचे महत्त्वपूर्ण कार्य करते. व्यक्तीवर या पंचायतीचे नियंत्रण असल्याने व्यक्ती पंचायतीच्या विरोधी वर्तन करीत नसत. समाजातील कोणत्याही समस्या, वाद, प्रश्नांचा निर्णय भोरगाव पंचायतीत घेतला जात असे. यादृष्टीने पंचायतीला तसे अधिकार दिले होते.

भोरगाव पंचायतीत सर्वानुमते समाजविकासासाठी काही नियम तयार केले. आपल्या गावात हे नियम गावकरी पाळतात का ? याची जबाबदारी गावपंचांची असे. हे नियम सर्व थरातील लोकांसाठी बंधनकारक असत. गावातील लोकांनी विघातक मार्ग स्वीकारू नये, दैनंदिन जीवनात नियमांचे पालन करावे. यासाठी गावपंच प्रत्येक व्यक्तीवर नजर ठेवीत असत. त्यामुळे पंचायतीचे समाजावर नियंत्रण असल्याने सामाजिक नियंत्रण ठेवण्याचे कार्य पंचायत करते. त्याबरोबरच न्यायनिवडा, भाऊबंदकी, घटस्फोट, शिक्षण, पोटजातीचे प्रश्न पंचायतीमार्फत सोडविले जात. लेवा पाटीदारांच्या काही पोटजातींना पंचायतीने जात प्रवाहात सामावून घेतले व त्यांच्याशी रोटी-बेटी व्यवहार सुरू करून सामाजिक एकात्मता जपून ठेवली.

भोरगाव लेवा पंचायतीचे घटस्फोटविषयक कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. पुरूष प्रधान संस्कृतीने पती कितीही अन्याय करणारा असला तरी पत्नीला जुळवून घेऊन, त्याच्याबरोबर संसार झाला. परंतु भोरगाव पंचायत स्त्री-पुरुष समानतेच्या बाबतीत जागरूक असल्याने १९२४ सालीच त्यांनी स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार दिला. त्यातील प्रमुख अटी (१) पती संन्यासी असल्यास (२) पती नपुसंक असल्यास (३) पती कुष्ठरोगी असल्यास (४) पती बारा वर्षापर्यंत बेपत्ता असल्यास (५) पती जाती भ्रष्ट असल्यास (६) पतीस दुसरी बायको असली व तो तिला त्रास देत असेल तर पत्नीला पतीपासून घटस्फोट मिळत असे.

घटस्फोट संदर्भात पंचायत दोन्ही पक्षांचे म्हणजे ऐकल्यानंतर त्यांना प्रथम घटस्फोटासंबंधी परावृत करण्याचा प्रयत्न करीत असे. सामोपचाराने वाद मिटवून पुन्हा उभयतांनी एकत्रित राहून संसार करावा असा पंचायतीचा आग्रह असायचा. त्यासाठी गरज असल्यास दोन्ही पक्षांना पुरेसा अवधी देऊन पुढच्या सभेत विषय मांडण्याची परवानगी दिली जात असे. घटस्फोट घेणे अटळ आहे अशी परिस्थिती असल्यास पंचांचा विचार लक्षात घेऊन सभेचे अध्यक्ष निर्णय देत असत.

कालांतराने इंग्रजांच्या आगमनाने समाजात बरेच बदल झाले. जाती पंचायतीच्या निर्णयात कायद्यांनी शिथीलता निर्माण झाली. घटस्फोटाच्या बाबतीत मात्र आजही लेवा पाटीदार समाज भोरगाव पंचायतीचा आधार घेताना दिसतो. आतापर्यंत घटस्फोटाच्या संदर्भात निकाल देण्यात पंचायतीला मोठ्या प्रमाणात यश मिळाले आहे. लेवा पाटीदार समाजातील श्रीमंत आणि गरीब यापैकी ८०% घटस्फोट हे पंचायतीमार्फत घेतले जातात.

• • •



# छायाताई सुरतवंती, अंबरसिंग महाराजांच्या धर्मपत्नी

**वाहरु सोनवणे**

अंबरसिंग महाराज धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील दलित-आदिवासी कष्टकरी चळवळीचे नेते. न्याय्य हक्कांसाठी लढणाऱ्या चळवळीला एक उधाण आले होते. समाज-जागृतीचे नव-चैतन्य सळसळत होते आणि अंबरसिंग महाराज २४ फेब्रुवारी १९७४ ला सर्व श्रमिकांना सोडून गेले-निधन पावले. चळवळीचा आधारस्तंभ गेल्यामुळे चळवळीला एक मोठा धक्का बसला. अशा दुःखाच्या प्रसंगी छायाताईंनी दुःखाचे अश्रू पुसून अंबरसिंग महाराजांनी उभ्या केलेल्या चळवळीला वाहून घेतले.

कष्टकऱ्यांच्या राज्याचे सुंदर स्वप्न अंबरसिंग महाराजाने समाजासमोर उभे केले होते. त्या स्वप्नाच्या दिशेने जाण्यासाठी समाजाला जागृत करणे, प्रबोधन करणे, संघटीत करणे आणि न्याय्य हक्कांची लढाई लढण्याचा निर्धार छायाताईने केला.

समाज अजूनही अन्याय अत्याचार आणि दारिद्र्याच्या खाईतून बाहेर पडला नव्हता. दारु, जुगार, वरली मटका इत्यादी व्यसनात समाज ग्रस्त होता.

दारु, जुगार आणि सट्टा इत्यादी वाईट व्यसनांमुळे समाजाच्या अनेक पिढ्या बरबाद झाल्या. भावी पिढ्यांचे संरक्षण करायचे असेल, वाचवायचे असेल तर या व्यसनापासून दूर रहा. दूर राहिले पाहिजे असे छायाताईने वारंवार सांगितले. प्रबोधन केले. फक्त प्रबोधन केले असे नाही तर गावागावात जाऊन संघटीतपणे मोर्चे बांधले. मोर्चे काढून दारुचे मटके फोडले. जुगाराच्या अड्ड्यांवर धाड टाकून पत्ते फाडले. सट्ट्याच्या एजंटांना गाव बंद केले. समाज व्यसनाधीन झाल्यामुळे या व्यसनातून बाहेर निघत नव्हता, अशा समाजाला बाहेर काढण्यासाठी समाजाचा रोष पत्करुन छायाताईंना या व्यसनाच्या विरोधात लढावे लागले.

''शिकलेली मुलं आपल्या हक्कासाठी जागतात, समाजाला जागवतात. अन्याय-अत्याचाराच्या विरोधात लढतात. शिकलेल्या मुलांना लढण्याची ताकद येते. माणूस म्हणून जगण्याची दिशा मिळते म्हणून आपण आपल्या मुलांना शाळेत पाठवा आणि अन्याय-अत्याचाराच्या विरोधात उभे करा'' असे छायाताई अन्याय-अत्याचाराच्या विरोधातली लढाई लढताना सांगत असे.

देश आर्थिक अरिष्टात सापडल्याने या संकटातून बाहेर पडण्यासाठी इंदिरा सरकारने १९७५ ला देशात 'आणीबाणी' पुकारली. देशाच्या विकासाला अडथळा असे ठरवून देशातील पक्ष संघटनावर बंदी आणली. देशातील पक्षसंघटनांच्या कार्यकर्त्यांची त्यांनी धरपकड सुरु केली. श्रमिक संघटनेवर बंदी आणली. संघटनेच्या

कार्यकर्त्यांसह छायाताईंना अटक झाली. आणीबाणीत छायाताई यांना येरवडा जेल पुण्यात स्थानबद्ध करण्यात आली. छायाताई शिक्षा भोगून बाहेर आल्या. कच न खाता मोठ्या जोमाने दलित आदिवासी कष्टकऱ्यांच्या हक्कासाठी लढत राहिल्या.

व्यसनमुक्ती, शिक्षण, आरोग्य आणि आदिवासींवर होणारे अन्याय-अत्याचाराच्या विरोधात लढा लढून आदिवासी समाजाची सेवा केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाने छायाताईना 'आदिवासी सेवक' पुरस्कार देऊन गौरव केला.

आदिवासी अस्तित्व, अस्मिता, आत्मसन्मान, कला, मान, संस्कृती, इतिहास, स्वयंनिर्णय, स्वावलंबन आणि विकास इत्यादी मुद्यांना केंद्र मानून १९९२ ला आदिवासी एकता परिषदेची स्थापना झाली आणि १९९४ ला आदिवासी एकता परिषदेतर्फे अंकुशविहिर, तालुका अक्कलकुवा येथे पहिले 'आदिवासी एकता सांस्कृतिक महासंमेलन' आयोजित करण्यात आले होते. या पहिल्या महासंमेलनाच्या संमेलनाध्यक्षांचा मान छायाताई सुरतवंती यांनी भूषविला.

जीवन जगताना, जीवन कशासाठी जगावे, जीवनाची दिशा काय असावी याबाबत छायाताई स्पष्ट होत्या. ठाम होत्या. त्या अनेक सभा-मोर्चात, चर्चासत्रात, संमेलनात, महासंमेलनात आपली भूमिका मांडत असताना आपले दु:ख व्यक्त करीत असत की, ''आदिवासी स्त्रीला गावात डाकीण म्हणून ठेचून मारण्यात येते, गावपंचायतमध्ये आदिवासी स्त्रिला स्थान नाही, आदिवासी स्त्रीला संपत्तीवर अधिकार नाही, घर जमीन आणि मुलं नवऱ्याच्या नावे असतात, आदिवासी स्त्रीला संपत्तीच्या अधिकारापासून वंचित आहे. आदिवासी स्त्रीपण पुरुषप्रधान व्यवस्थेची गुलाम आहे.'' अशा या सर्व गुलामीच्या विरोधात छायाताई उभ्या राहिल्यात. लढल्यात.

आदिवासी समाजात पूर्णवेळ स्त्री कार्यकर्त्या जवळपास नाहीत. छायाताई चळवळीत पूर्णवेळ आदिवासी महिला कार्यकर्त्या होत्या.

अंबरसिंग महाराज भूमिहीन शेतमजुरांच्या पोटी जन्म घेतल्याने छायाताईकडे जमीन नाही, जगण्याचे कोणतेही साधन नाही. पती नसणाऱ्या विधवा स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन दूषित आणि विकृत असतो. नाजूक मनाच्या स्त्रिया कोलमडून पडतात; पण छायाताईंच्या समोर चळवळ होती. चळवळीचे स्वप्न होते. म्हणून जीवन जगताना अनेक समस्यांना तोंड देत अनेक प्रकारचे दु:ख पचवित छायाताई न डगमगता निर्धाराने चालत राहिल्या. लढत-लढत छायाताई दिनांक १०/६/२००८ रोजी शांत झाल्या. जगाचा निरोप घेतला.

उभ्या आयुष्यात स्वार्थ पाहिला नाही. सामाजिक न्याय हाच आपला स्वार्थ, हेच आपले हित, हीच भावना हेच स्वप्न, हाच निर्धार छायाताईने आपल्या उरी बाळगले. समाज परिवर्तन आदिवासीमुक्ती, स्त्रीमुक्ती, प्रकृतिमुक्ती आणि मानवमुक्तीच्या लढ्यात पुढाकार घेणाऱ्या तेजस्वी रणरागिणीला वंदन केले पाहिजे. सलामी दिली पाहिजे.

*आदिवासी एकता परिषदेतर्फे*

*छायाताई सुरतवंती यांना*

*भावपूर्ण श्रध्दांजली !*

• • •

# विज्ञान वाहिनीची फिरती प्रयोगशाळा

**श्री. सुधीर जोग, पेण**

शहरी व ग्रामीण भागातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या विज्ञान शिक्षणातील असमानता दूर करण्यासाठी 'विज्ञानवाहिनी' हा एक अभिनव व पथदर्शी उपक्रम पुणे येथे १९९५ साली सुरु करण्यात आला आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना वरदान ठरलेली अद्ययावत सोयीसुविधांनी सुसज्ज अशी फिरती प्रयोगशाळा हे 'विज्ञानवाहिनी'चे वैशिष्ट्य आहे. फिरत्या प्रयोगशाळेच्या विशिष्ट गरजांचा विचार करून या गाडीमध्ये खास अंतर्गत रचना, सोयीसुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. यात वैज्ञानिक उपकरणे, शैक्षणिक सहाय्यभूत साधने, दृक्-श्राव्य संसाधने, प्रयोग साहित्य मांडण्यासाठी टेबले, इंजिन बॅटरीसह इन्व्टर, विद्युत जनित्र, दुमडता येण्यासारखी शयनसुविधा, प्रसाधनगृह, पाण्याची टाकी यांचा समावेश आहे.

वैज्ञानिक, शिक्षक- प्राध्यापक, अभियंते अशा निवृत्त अनुभवी व्यावसायिकांचा समावेश असलेला 'संवाद व कृतिगट' हा विज्ञानवाहिनीचा खरा कणा आहे. परस्पर सामंजस्य, सर्वसहमतीने घेतलेले निर्णय, वक्तशीरपणा व काटेकोरपणा ही या गटाची वैशिष्ट्ये आहेत. हुशार असूनही संधीअभावी वंचित राहिलेल्या ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानशिक्षणाची गोडी वाढविणे, त्यांचेमध्ये वैज्ञानिक व विवेकी दृष्टीकोन निर्माण करण्याचा ध्यास व सेवावृत्ती हा विज्ञानवाहिनीच्या संवाद व कृतिगटाला एकत्र जोडून ठेवणारा दुवा आहे.

**शाळांना भेटी –** विज्ञान वाहिनीच्या चार-पाच सदस्यांचा समावेश असलेला संवाद व कृतिगट फिरत्या प्रयोगशाळेमधून पूर्वनियोजित दिवशी निवडलेल्या शाळेला भेट देतो. शाळांची निवड करताना पुढील निकष लक्षात घेऊन प्राधान्य दिले जाते. १) ग्रामीण भागातील/कमी वस्तीच्या दुर्गम गावातील लहान शाळा २) विज्ञान प्रयोगशाळा उपलब्ध नाही ३) विनाअनुदानित शाळा ४) संसाधने उपलब्ध नाहीत. शाळा गळत्या छपराखाली, देवळात किंवा मोठ्या झाडाखाली भरो. शाळेत पोहचताच कामाला सुरुवात होते. संपूर्ण दिवसभराच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना स्वत: प्रयोग करण्याची, वैज्ञानिक उपकरणे हाताळण्याची संधी देण्यात येते. तसेच काही प्रयोगांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात येते. प्रत्यक्ष कृतीला वाव देणाऱ्या सत्रांबरोबरच दृक्-श्राव्य शैक्षणिक संसाधने, संगणक शिक्षण, पर्यावरण, वैयक्तिक व परिसर स्वच्छता, वयात येणाऱ्या मुला-मुलींना जीवन कौशल्यासंबंधी माहिती असे प्रबोधन होते. शिवाय आरोग्य, आहार, स्वयंचलित आगगाडीची प्रतिकृती इत्यादींचा उपलब्ध वेळेनुसार समावेश होतो. विद्यार्थ्यांनी आवश्यक तशी शिक्षकांची मदत घ्यावी, प्रश्न विचारावेत, कुतहुल शमवावे व संकल्पना समजावून घ्याव्यात यासाठी विज्ञान वाहिनी 'प्रयोग-प्रयत्नशील' आहे.

**विज्ञान मेळावा –** विज्ञानवाहिनीचा संवाद व कृतिगट जेव्हा एखाद्या मोठ्या शाळेला भेट देतो तेव्हा 'विज्ञान मेळावा' आयोजित करण्यात येतो. टेबलावर मांडलेले विज्ञान साहित्य वापरण्यास व त्यामागील वैज्ञानिक तत्त्व समजावून घेण्यास निवडक मोठ्या मुलांना शिकविण्यात येते. त्यानंतर ही मुले त्यांच्या सहाध्यायी मुलांचे प्रयोगांद्वारे वैज्ञानिक प्रबोधन करतात. यामुळे

निवडलेल्या मोठ्या मुलांचा आत्मविश्वास वाढतो व त्यांचेपेक्षा लहान मुलांसमोर एक आदर्श निर्माण होतो.

**अन्य उपक्रम –** शालेय शिक्षकांचे विज्ञान अध्यापन कौशल्य वाढविण्यासाठी वर्षातून ६ ते ८ वेळा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येतात. शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी आयोजित करण्यात येणाऱ्या शिबिरांत ग्रामीण विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांशी सुसंवाद साधण्याची संधी देण्यात येते. विद्यार्थ्यांचे विचारविश्व व्यापक करण्यासाठी पुण्याजवळील मोठे कारखाने, पुणे विद्यापीठ व परिसर, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, आयुका खगोलविज्ञान केंद्र इ. ठिकाणी भेटी आयोजित करण्यात येतात. शाळांना पुस्तकपेट्या भेट देऊन मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी 'फिरती विज्ञान – वाचनालये' चालविण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येते. दरवर्षी 'विज्ञान विचार' वार्षिक प्रसिध्द करण्यात येते. त्यात विज्ञान व गणित या विषयांवर मौलिक लेखन असते. हॅलो मेडिकल फाऊंडेशनच्या सहकार्याने अणदूर (जि. उस्मानाबाद) येते सुरु केलेल्या ग्रामीण विकास केंद्रातील विज्ञान प्रयोगशाळेत जवळपासच्या शाळांतले विद्यार्थी प्रयोग करतात. पुस्तक पेट्यांचे वितरण, वार्षिक निबंध स्पर्धा, सर्वसामान्यांसाठी विज्ञान जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. अहमदनगर जिल्ह्यातील सुरोडीच्या गावकऱ्यांनी राळेगणसिद्धी, हिवरेबाजार अशा आदर्श गावांना भेट देऊन जलसंधारणाचे महत्त्व ओळखले. विज्ञान वाहिनीने जलसंधारण प्रकल्पासाठी मदत केली. काही बंधारे लोक सहभागातून बांधून 'पाणी अडवा – पाणी जिरवा' मोहिम यशस्वी केली. यामुळे गावातील विहिरींना बाराही महिने पाणी आले व शेती, दुग्धव्यवसाय या उद्योगांमधून गावाचे उत्पन्न तिपटीहून अधिक वाढले.

**नवीन उपक्रम –** विज्ञानवाहिनीने का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानच्या सहकार्याने पुणे महानगर प्राधिकरण क्षेत्रात समाविष्ट झालेल्या धायरी या गावात 'प्रायोगिका' हे विज्ञान कृती केंद्र सुरु केले आहे. पुणे शहर व परिसरांतील शालेय विद्यार्थ्यांना या केंद्रात येऊन प्रयोग करणे, विज्ञान प्रकल्प नियोजन, संगणक सराव, गणितवर्ग अशी अनेक प्रकारची मदत मिळू शकते. हा उपक्रम फिरत्या प्रयोगशाळेस समांतर व पूरक स्वरुपाचा आहे.

**विज्ञान वाहिनीची यशस्वी वाटचाल –** जुलै १९९५ मध्ये फिरत्या प्रयोगशाळेची सुरुवात झाल्यापासून आतापर्यंत महाराष्ट्राच्या २५ जिल्ह्यांत फिरती प्रयोगशाळा पोहोचली असून १८०० हून अधिक शाळांना दिलेल्या भेटींमुळे आतापर्यंत दोन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना लाभ झाला आहे.

**सक्रिय सहभागासाठी आवाहन –** फिरत्या प्रयोगशाळेने दिलेल्या भेटीबद्दल विज्ञानवाहिनी कोणत्याही शाळेकडून शुल्क घेत नाही. विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेची सुविधा विनामूल्य उपलब्ध करून दिली जाते. विज्ञान वाहिनीचे कार्य शासकीय मदतीशिवाय केवळ लोकसहभागातून चालू आहे. वैज्ञानिक दृष्टी व विज्ञानप्रसाराची आवड व तळमळ असणाऱ्या कार्यकर्त्यांचे 'विज्ञानवाहिनी' स्वागत करते. विज्ञानवाहिनीच्या कार्यासाठी आपण आपला अमूल्य वेळ, नैपुण्य व अर्थसहाय्य द्यावे असे आवाहन विज्ञान वाहिनीने केले आहे. विज्ञानवाहिनीची सार्वजनिक धर्मादाय न्यास नोंदणी (ई–२०२४, पुणे) १९९५ साली झाली असून देणगी रकमेवर कलम ८०–जी अन्वये आयकरात सुट मिळू शकते. आपण देणगीचा धनादेश ''विज्ञानवाहिनी, पुणे'' या नावाने काढावा.

• • •

# 'देवबाग' मधील समाज जीवन

**प्रस्तावना**

पारंपरिक मानवशास्त्र म्हणजे मानवाचा सर्वांगीण अभ्यास. या अभ्यासाची दोन मूलभूत तत्वे आहेत. एमिक आणि एटिक (Emic & Etic Perspectives) या पैकी पहिले तत्व म्हणजे ज्या मानव समूहाचा अभ्यास करावयाचा त्यांच्या नजरेतून वस्तुस्थितीचे विश्लेषण करणे होय. त्यांची नजर ही त्या समूहाच्या व्यक्तीमत्त्वाचे इतिहास, भूगोल, राजकीय संस्था, पर्यावरणीय परिस्थिती, संस्कृती इ. अंगानी दर्शनच घडवित असते.

पुणे विद्यापीठातील विद्यार्थी अशाच प्रकारचा अभ्यास करण्यासाठी आजही आदिवासी समाजामध्ये व ग्रामीण भागात जात असतात. त्यातून हाती लागणारी माहिती ही शास्त्रीय स्वरूपाची असल्याने तिची सत्यता कोणालाही पडताळून पाहता येते व ती वस्तुनिष्ठ असते. अशा प्रकारच्या संशोधनामध्ये संशोधकाचा संबंधित समाजाशी प्रत्यक्ष संबंध येतो. तो त्या समाजाशी प्रत्यक्ष बोलतो. त्या लोकांना बोलते करतो आणि त्यांच्या आयुष्याच्या विविध पैलूंशी परिचय करुन घेतो.

अशाच प्रकारचा एक अभ्यास पुणे विद्यापीठाच्या मानवशास्त्र विभागाच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या मालावण तालुक्यातील देवबाग नामक गावातील गाबित समाजाचा केला. प्रस्तुत अभ्यास ७ डिसेंबर २००६ ते २० डिसेंबर २००६ या कालावधीत सुमारे बारा दिवसांच्या मुक्कामात करण्यात आला असून या माध्यमातून विद्यार्थ्यांना या गावामध्ये प्रत्यक्ष राहून गाबित समाजाचे राहणीमान व जीवन जवळून पाहण्याची एक संधी या अभ्यासाने दिली.

**देवबाग एक दृष्टीक्षेप**

कोकण म्हणजे लांबच लांब समुद्र किनारा लाभलेला निसर्गरम्य प्रदेश. या प्रदेशात ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांचा समावेश होतो. त्यापैकी सिंधूदुर्ग हा कोकणातील सर्वात दक्षिणेकडचा व अखेरचा जिल्हा. पूर्वी हा जिल्हा रत्नागिरी जिल्ह्याचाच भाग होता. नंतर प्रशासकीय सोयीसाठी आणि शेती व उद्योगधंद्याच्या विकासाच्या दृष्टीकोणातून १ मे १९८१ रोजी रत्नागिरी जिल्हा रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या दोन जिल्ह्यांमध्ये विभागण्यात आला. सध्याच्या सिंधुदूर्ग जिल्ह्यात आठ तालुके येतात.

'सिंधुदूर्ग' नावाचा किल्ला छत्रपती शिवाजीमहाराजांनी इ. स. १६६४ मध्ये बांधावयास घेतला. ह्या मालवण नजिकच्या समुद्री किल्याच्या नावावरुनच या प्रदेशाला सिंधुदूर्ग हे नाव मिळाले असे म्हणतात.

सिंधुदूर्ग जिल्हा हा ओरोस, रत्नागिरी व दक्षिणेकडे गोवा व कर्नाटकचा बेळगाव जिल्हा यामध्ये वसलेला आहे. त्याच्या पश्चिमेस अरबी समुद्र तर पूर्वेला सह्याद्रीचा पश्चिम घाट आहे. सिंधुदूर्गचे एकूण क्षेत्रफळ ५२०७ चौ. कि. मी. एवढे आहे.

मालवण तालुक्याच्या नैऋत्य दिशेला २० कि. मी. अंतरावर देवबाग गावाचा चिंचोळा भाग आढळतो. तारकर्ली नावाचे प्रसिध्द पर्यटनाचे स्थळ मालवण ते देवबाग याच मार्गावर वसलेले आहे. तसेच सिंधूदुर्ग जिल्ह्यामध्ये कार्ली नावाची एक प्रमुख पूर्ववाहिनी नदी आहे. या कार्ली नदी आणि अरबी समुद्रामध्ये एक लहानसा जमिनीचा भाग पसरलेला आहे, तो म्हणजेच देवबाग हे गाव होय. गावाच्या पश्चिम बाजूस कार्ली

नदी अरबी समुद्राला जाऊन मिळते. ती जागा संगम म्हणून ओळखली जाते. या भागातील नद्यांचा नावा हाकण्यासाठी आणि मासेमारीच्या दृष्टीने फारसा उपयोग होत नाही, ही गोष्ट देवबागच्या कार्ली नदीच्या बाबतीतही लागू होते. मात्र देवबागची समुद्र परिस्थिती आणि प्राण्यांचे वैविध्य जपण्यात कार्ली नदीचा मोठा हातभार लागतो हे विशेष आहे.

देवबागची लांबी ४.५ कि. मी. असून त्या गावाचा विस्तार १०,००० चौ. कि. मी. आहे. एकूण जमिनीपैकी ३९.५५० चौ. कि. मी. जमीन ही घरबांधणीसाठी आहे. ४२.२०० चौ. कि. मी. नारळाच्या लागवडीसाठी आहे. २९.२५० चौ. कि. मी. पडिक जमिनीखाली येते. देवबाग हे ६०० घरांची वस्ती असलेले व ३००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल छोटेसे गाव आहे. देवबाग हे नदी आणि समुद्र यामध्ये वसलेले असल्याने त्याला समुद्री जैवसंस्कृती आणि खाडीदेखील लाभलेली आहे.

**हवामान**

हा प्रदेश समुद्र किनारी असल्याने दिवसा व रात्रीच्या तापमानात फारशी तफावत आढळत नाही. तसेच समुद्र सानिध्यामध्ये हवेमध्ये आर्द्रता जास्त व हवामान साधारणत: नेहमी बाष्पयुक्त आणि दमट असते. इतर भारतीय उपखंडातील प्रदेशाप्रमाणे मोसमी हवामानाची विभागणी पुढीलप्रमाणे असते.

उन्हाळा : मार्च ते मे

पावसाळा : जून ते ऑक्टोंबर

हिवाळा : नोव्हेंबर ते फेब्रुवारी

पावसाळ्यात आभाळ ढगाळ असते. पश्चिम व दक्षिण दिशेने जोरदार वारे वाहतात. जूनच्या मध्यात पाऊस पडायला सुरुवात होते आणि क्वचितच विश्रांती घेत तो ऑक्टोबरच्या पंधरावड्यापर्यंत पडत राहतो. पावसाचे प्रमाण सर्व भागात सारखे आढळून येत नाही. किनारी प्रदेशाकडून पश्चिम घाटापर्यंत तो जलद गतीने वाढतच जातो. एकंदर वार्षिक प्रमाणाच्या १/३ पाऊस जुलै महिन्यात पडत असल्याने या महिन्यात सर्वात जास्त पाऊस होत असल्याचे लक्षात येते.

**जमीन / माती**

सिंधूदुर्ग जिल्ह्यात साधारणत: तीन प्रकारची जमीन माती आढळते.

१) जांभा दगड (Laterite Soil)

२) खारी जमीन (Salty Soil)

**पाणी**

पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे देवबाग हे गाव म्हणजे अरबी समुद्र आणि कार्ली नदीच्या दरम्यान असलेला एक लहान भूभाग आहे. परिणामी गावामध्ये खारे पाणी आणि गोडे पाणी असे दोन्ही मुबलक प्रमाणात आढळते. गावातल्या विहिरी या उथळ आहेत, कारण त्या खोलवर खणल्या तर खारे पाणी लागण्याची शक्यता अधिक आहे. या विहिरीमधूनच गावकऱ्यांना गोड्या पाण्याचा पुरवठा होतो. कुटुंब सर्वेक्षणामध्ये प्रत्येक घराला स्वत:ची विहीर असल्याचे आढळून आले आहे. तिन्ही बाजुंनी खाऱ्या पाण्याने वेढले असताना गोड्या पाण्याचा पुरवठा गावाला सतत होत राहणे हे येथील रहिवाशांच्या दृष्टीने चमत्कारच आहे. जणू देवाने दिलेली ही भेटच आहे, असेही ते मानतात.

अशा प्रकारे सिंधूदुर्ग जिल्ह्याला विशिष्ट असे सागरी हवामान लाभले आहे. देवबाग हे जिल्ह्याच्या पश्चिमेस वसलेले असल्याने साहजिकच त्या गावाचे हवामान आणि पर्यावरणीस परिस्थितीवर उल्लेख केलेल्या जिल्ह्याच्या विविध भौगोलिक घटकांचा परिणाम झालेला आढळतो.

**'देवबाग' मधील घरे**

गावामध्ये साधारणत: तीन प्रकारची घरे दिसून येतात, ती प्रामुख्याने घरबांधणीसाठी लागणाऱ्या साहित्यावर विभागलेली दिसून येतात.

**१) कच्ची घरे**

मातीची किंवा शेणाची भिंत, मातीची जमीन आणि झापांचे किंवा कौलाचे छप्पर यांचे प्रमाण २६% आहे.

**२) अर्ध पक्की घरे**

जांभ्या दगडापासून बनविलेली भिंत, मातीची जमीन आणि कौलाचे छप्पर यांची एक तर भिंत किंवा छप्पर हे पक्क्या घराच्या भिंती किंवा छपरासारखे असते. त्यांचे प्रमाण ६०% एवढे आहे.

**३) पक्की घरे**

या घराच्या भिंती भाजलेल्या विटा / दगड / सिमेंट / सिंथेटीक / लाकडी / पीयुसी साहित्याच्या असून, जमीन सिमेंटची असते; तर कौलासाठी ॲस्बेस्टॉस किंवा पत्र्याचा वापर झाल्याचा दिसतो.

लहान आकाराच्या घरापासून ते मोठ्या आकाराची घरे इथे आढळतात. ही घरे दगडी किंवा मातीच्या जोत्यावर उभारलेली असून त्याला मातीच्या भिंती आणि पूर्व किंवा पश्चिम दिशेने असलेली बांधीव छपरे आहेत. अशा रचनेमुळे साधारणत: सर्व घरे सारखीच असतात. आर्थिकदृष्ट्या चांगल्या घरासाठी दगड, विटा, सिमेंट, लोखंड इत्यादीचा वापर होत असल्याने प्रत्येक घराचा आर्थिक दर्जा आणि कुटुंबाचा आकार समजण्यासाठी उपयोग होतो. सर्वसाधारण-पणे प्रत्येक घराला तीन खोल्या असतात. प्रवेश करताच बैठकीची खोली नंतर झोपण्याची खोली आणि सर्वात आतील बाजूस असते ती स्वयंपाकाची खोली.

घर बांधताना दोन प्रकारचे धार्मिक विधी पार पाडले जातात. 'भूमीपूजा' ही बांधकाम सुरु करण्यापूर्वी केली जाते, तर घर बांधून झाल्यावर तिथे राहण्यास येणाऱ्या कुटुंबाला त्या घरात सुख, शांती, आनंद प्राप्त होण्यासाठी 'वास्तुशांत' केली जाते.

येथे घरबांधणीसाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्यामध्ये आता बदल झाल्याचे दिसून येते. नारळाच्या पानांचा 'झाप' जाऊन त्याच्या जागी छपरासाठी भाजकी कौले, लोखंडी पत्रा, ॲस्बेटॉसचा पत्रा आणि सिमेंटचे सपाट छप्परही बांधण्यात येत असल्याचे दिसून येते. मातीच्या भिंतींच्या जागी आता विट, वाळू, दगड, सिमेंट यांची भित दिसते, ती सिमेंटच्या साह्याने लीपली जाते.

देवबागच्या एकंदर वस्तीच्या रचनेकडे पाहिले असता त्या वस्त्यांची पद्धत बदलात आल्याचे दिसते. पूर्वीसारखे हे गाव अलग राहिलेले नाही. जरी ते तिन्ही बाजुंनी समुद्राने वेढलेले असले तरी आजुबाजूच्या खेड्यांशी, गावांशी, शहरी भागांशी त्यांचा संपर्क वाढत आहे. घराची रचनाही आता बदललेली आढळते. पूर्वी वेग-वेगळ्या जाती-जमाती आपापल्या नातेवाईक, मित्र मंडळींसहीत ''दलस्टर'' पद्धतीने एकत्र रहायचे; पण तेच आता विखुरल्यामुळे हळूहळू लोक समुद्राच्या दिशेने वस्ती करीत असल्याचेही आढळून येते.

**प्रमुख व जोड व्यवसाय**

देवबाग हे प्रामुख्याने कोळ्यांचे गाव. साहजिकच मासेमारी हा तेथील प्रमुख व्यवसाय आहे. तेथे खाऱ्या पाण्यातील तसेच गोड्यापाण्यातील अशा दोन्ही प्रकारची मासेमारी होते. तथापि खाऱ्या पाण्यातील माश्यांपेक्षा गोड्या पाण्यातील मासे अधिक पसंत केले जातात. मासेमारी खेरीज शेतीही केली जाते.

शेती उत्पादनाबद्दल बोलायचं झालं तर तांदूळ हे प्रमुख पीक असून नागली, वरी ही दुय्यम पिकेही घेतली जाताना आढळतात. तसेच सागरी पर्यावरणामुळे

नारळाचे पीकही मोठ्या प्रमाणात घेतले जाते. शिवाय काजू, सुपारी, फणस आणि कोकम ही इतर पिके काढली जातात. डाळीचे पीक हे दुय्यम स्वरूपाचे म्हणून घेतले जाते.

### शिक्षणाचा दर्जा

देवबागमध्ये शिक्षणाचे मोठे प्रमाण आढळते. जवळ जवळ ७०% लोकसंख्या शिक्षित आहे किंवा शिकत आहे. गावामध्ये अंगणवाडी ते चौथी पर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे.

## *देवबागमधील उपलब्ध असलेल्या सुविधा*

### रस्ते व वीज

गावाच्या प्रवेशद्वारापाशीच एक विठ्ठल मंदिर आहे. ते मंदिर गावाची सुरुवात दर्शवते. गावाच्या मध्य भागातून एक रस्ता पक्का डांबरी जातो. या मुख्य रस्त्याला अनेक गल्ल्या येऊन मिळतात.

बहुतांशी घरात आता वीज पोहोचली आहे. गावामध्ये एकंदर ४८ वीजेचे खांब ठराविक अंतरावर उभारलेले दिसतात. त्या खांबावर ग्रामपंचायतीचे साधारण ३८-४० दिवे बसवलेले आहेत. काही सधन कुटुंबात दूरचित्रवाणी, टेप रेकॉर्डर, रेडिओ इत्यादी साधनांचा वापर होत असल्याचे दिसते, असे असले तरी काही गरीब लोकांच्या घरात मात्र वीज अद्याप अलेली नाही.

### पाणी पुरवठा

गावात एकंदर ३० विहिरी असल्याने गावाला गोड्या पाण्याचा मुबलक प्रमाणात पुरवठा होतो. ह्या विहिरीला वर्षभर पाणी असल्याने त्या कधी कोरड्या पडत नाही, त्यामुळे गावकऱ्यांना पाण्याची कमतरता भासत नाही. गावातील काही श्रीमंत लोक विजेवर चालणाऱ्या पंपाच्या साह्याने नारळाच्या झाडांना विहिरीचे पाणी देतात.

### आरोग्यसेवा

देवबागपासून २१ कि. मी. अंतरावर 'चौके' या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. तेथे योग्य त्या मुलभूत आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध असून आवश्यक ती औषधेही मिळण्याची सोय आहे. परंतु देवबाग पासून थोड्या अंतरावर असल्याने लोक तिथ-पर्यंत फारसे जात नाहीत. गावामध्येच या केंद्राचे उपकेंद्र आहे. तेथे एक पुरुष (एम. पी. डब्ल्यू.) व ए. एन. एम. (महिला) उपकेंद्राचा कारभार पाहतात. शिवाय गावात चार 'सुईणी' व दोन 'वैदू' हे देखील आरोग्य सेवा पुरविताना दिसतात. एकंदर देवबागला मालवण हे तालुक्याचे ठिकाण जवळ असल्याने तेथील ग्रामीण रुग्णालयाची आरोग्य सेवा गावकऱ्यांना घेता येते. शिवाय इथे खाजगी रुग्णालयेही आहेतच.

### दुकाने

गावातून जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या कडेला न्हावी, शिंपी अशी इतर दुकाने आढळतात. काही हॉटेलही दिसतात. तुलनेने ही दुकाने शहरातल्या दुकानापेक्षा मोठी नसली तरी गावकऱ्यांच्या गरजा पूर्ण होण्याच्या दृष्टीने उपयोगी पडतात. शिवाय दर सोमवारी मालवणचा आठवडी बाजार असतोच.

### देवबागची लोकसंख्या

देवबागची लोकसंख्या ३००० पेक्षा जास्त असून गाबित नामक कोळ्यांची ? वस्ती मोठ्या प्रमाणात (५५%) आहे. याशिवाय २७% ख्रिश्चन, १४% भंडारी, २.४% ब्राम्हण आणि १.२% मराठा आहेत. शिवाय मिस्त्री (गवंडी) सुतार व न्हावी अशा इतर जातींची / वर्गाची घरेही आहेत. देवबाग मध्ये १६ वाड्या आहेत. लोकसंख्येच्या दृष्टीने प्राबल्य असलेल्या गाबितांचे इतर मागासवर्गीयांच्या मुख्य यादीनुसार वर्गीकरण करण्यात आले आहे.

## कोकणचा गाबीत समाज

गाबीत हा समाज कोकणात सिंधुदूर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात आढळतो. कोळी जमात ही वेगळी जमात आहे. त्यांची संस्कृती वेगळी आहे. गाबीत ही स्वतंत्र जात आहे. गाबीत जात इ. स. १९६४ मध्ये वा त्यापूर्वी गाबीत या नावाने अस्तित्वात होती असे सांगण्यास पुरावा उपलब्ध नाही. मात्र त्यापूर्वीही गाबीत समाजाचे अस्तित्व होते. राजपूत मराठा जातीपासून तुटून पडलेली अनेक घराणी गाबीत व या जाती नावाने ओळखली जात आहे. मराठ्याचे आरमार नष्ट होईपर्यंत गाबीत शब्दाला विलक्षण प्रतिष्ठा होती. त्यानंतर त्यांचे राहणीमान घसरत गेले. गाबीत या क्षत्रिय आरमार घराण्याची वस्ती प्रामुख्याने किल्ला, समुद्र आणि खाडीच्या आसऱ्याने झालेली आढळते. रत्नागिरी किल्ला, जुवे-जैतापुर, विजयदुर्ग, देवगड किल्ला, तारामुंबरी, मीठमुंबरी, आचरे, सर्जेकोट, वेंगुर्ले, उभादंडा, शिरोडा, आरोंद, केर, तेरेखोल या ठिकाणच्या त्यांच्या वसाहती प्रसिद्ध आहेत.

उकड्या तांदळाचा भात, माशाची कढी (आमटी-निस्ताक) जोंधळ्याची वा तांदळाची भाकरी हे मुख्य अन्न. सकाळचा चहा क्वचित; परंतु उकड्या तांदळाची पेज असते. शेवग्याच्या शेंगांची भाजी, चवळी, कुळीथ, पावटे असली कडधान्ये अधूनमधून वापरतात. नाचणीच्या शेवया, तांदळाच्या पिठाचे घावने, सणासुदीला कोंबड्याची सागुती वडे किंवा आंबोळ्या, पाहुणे सोयऱ्यासाठी खास स्वयंपाक असतो. दारु पिण्याचे प्रमाण थोड्या प्रमाणात आढळते. व्यसनाधीनतेचे प्रमाण बरेच कमी आढळते.

पुरुष पंच धोतर नेसतात. अंगात बऱ्याच वेळा काही नसते. खांद्याला-डोक्याला टावेल, बाहेर वा शहरात जाताना सदरा शर्ट, टोपी घालतात. केसाला तेल चोपून भांग पाडण्याची सवय.

स्त्रिया नऊवारी लुगडे-चोळी, मुली परकर-पोलके घालतात. अलिकडे पाचवारी साडी, स्कर्ट व पंजाबी ड्रेसही घातला जातो. कपाळाला ठळक कुंकू. जुन्या बायका रेखीव चिरी अजुनही काढतात. श्रृंगाराचे वळेसर व आबोलीचे सैल आंगडाभर घालण्याचे हौस. पायात चांदीची जोडवी वेढणे घालतात. सोन्याच्या दागदागिण्यांची आवड. गाबीत पुरुष काटक, मजबूत बांध्याचा, असेल त्या परिस्थितीत समाधान मानणारा आहे. सतत कष्ट करणारा, पराक्रमी, स्वाभिमानी व एकमेकांवर विश्वास ठेवणारा, अडीअडचणींना धावून जाण्याची वृत्ती त्यांच्यात आहे.

स्त्रिया सौजन्यशील, कुलवंत, वर्णाने गोऱ्या सावळ्या. अंगाने मजबूत, थोड्याशा भांडखोर, घराचा सारा राबता पाहणाऱ्या, श्रध्दाळू देवधर्म पाळणाऱ्या असतात. अलिकडे शिक्षणात आघाडीवर असतात.

सगोत्र विवाह काही घराण्यात वर्ज्य मानला जातो. एकाच कुळात लग्न संस्कार केला जात नाही. देवघरात देवक ठेवण्याचा कुलाचार आहे. लग्न कार्यात देवकाची पूजा होते. मामाच्या मुलीशी लग्न होते, पण आते बहिणीशी लग्न वर्ज्य मानले जाते. लग्नाची मागणी वरपक्षाकडून किंवा वधुपक्षाकडून करण्यात येते. वधू पक्षाची आर्थिक स्थिती कमकुवत असल्यास लग्नखर्चासाठी काही रक्कम वधूपक्षाला देज देण्याची प्रथा पूर्वी होती. साखरपुडा व लग्नाचे विधी सर्व कामे ब्राह्मणाकडून केली जातात. लग्नाच्या दिवशी संस्कार गाणे म्हणतात. विधवा पुनर्विवाहाची प्रथा अल्प प्रमाणात आहे. प्रेत दहन करण्याची प्रथा आहे.

गाबीत जात हिंदू धर्माचे पालन करतात. अनेकजण वारकरी संप्रदायाचे अनुयायी आहेत. पंढरीची आषाढी, कार्तिकी वारी होते. काही घराण्यात रामदायी पंथाची उपासना चालते. गुरु घेण्याची पध्दत आहे. कोकणात जाऊन (गुरु जोगी नाथ पंथाची) गुरु दीक्षा घेण्यात येते.

• • •

(पृष्ठ क्र. २४ वरुन)

जगावे लागू नये यासाठी शासनाने ठिकठिकाणी धर्मशाळा किंवा निवारा केंद्रे उभी करावीत. तसेच आदिवासींना कामास ठेवणाऱ्या ठेकेदार, मोठे शेतकरी यांच्यावरही आदिवासीसाठी चांगली निवारा केंद्रे किंवा निवासाची व्यवस्था करण्याची सक्ती करण्यात यावी.

**४. अंगणवाड्यांची स्थापना**

जेथे आदिवासी स्थलांतर करतात तेथे सरकारने तात्पुरत्या अंगणवाड्यांची स्थापना करावी. अशा अंगणवाड्या सेवाभावी कार्यकर्ते, संस्था यांनाही उभ्या करण्यास प्रोत्साहन देण्यात यावे. त्यांना सरकारने परवानगी व मदत द्यावी. स्थलांतराच्या ठिकाणी अंगणवाड्या स्थापन केल्यास आदिवासींच्या बालकांना पूरक आहार, लसीकरण व इतर सुविधा मोफत मिळून त्यांच्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी होऊ शकेल.

**५. आरोग्य शिबीराचे आयोजन**

आदिवासी परगावी जेथे काम करतात त्या परिसरात शासन आणि सेवाभावी संस्था यांनी महिन्यातून एकदा आरोग्य शिबीर भरविणे आवश्यक आहे. या शिबीरात तपासणी व मोफत औषधे या सुविधा आदिवासींना उपलब्ध करून दिल्यास आदिवासी मजुरांचे आरोग्य चांगले राहील. त्यांच्यातील आजारी पडण्याचे तसेच कुपोषणाचे व मृत्यूचे प्रमाण कमी होईल.

**६. सुशिक्षित बेरोजगारांना नोकऱ्या**

दहावी, बारावी शिक्षण झालेले व असे शिक्षण चालू असलेले आदिवासी युवकसुद्धा रोजगारासाठी परगावी स्थलांतर करतात. अशा युवकांना शासनाने शिपाई, क्लार्क इत्यादी पदावर कायम स्वरूपी नोकऱ्या द्याव्यात. म्हणजे सुशिक्षित बेकार युवकांना स्थलांतर करावे लागणार नाही.

**६.० समारोप**

उपजीविकेसाठी वर्षातील काही दिवस परगावी स्थलांतर करणाऱ्या आदिवासींचे प्रमाण मोठे असून या आदिवासींना दरवर्षी स्थलांतर करावे लागते. शेतीत आणि सरकारच्या रोजगार योजनेत मिळणाऱ्या मजुरीपेक्षा परगावी स्थलांतराच्या ठिकाणी आदिवासींना अधिक मजुरी मिळते. स्थानिक भागापेक्षा आदिवासींना अधिक मजुरी मिळत असली तरी काही समस्यांनाही त्यांना तोंड द्यावे लागते. म्हणून स्थलांतर रोखणे आवश्यक आहे. आदिवासी भागातील कृषीक्षेत्रात रोजगार वाढीस सध्यातरी वाव नाही. तेथील शेती ही पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. म्हणून स्थलांतर रोखण्यासाठी सरकारने आदिवासी भागात रोजगाराची कामे मोठ्या प्रमाणात काढली पाहिजेत.

• • •

# गाबितांचे जीवनचक्र

देवबागमधील लोकांनी सांगितल्याप्रमाणे पूर्वीच्या काळी गर्भधारणेविषयी लोकांना नेमकी माहिती नव्हती. सध्याच्या काळात लोकांना बऱ्यापैकी माहिती आहे. स्त्री-पुरुष शरीर संबंधातून गर्भधारणा होते हे त्यांना पक्के ठाऊक आहे. ही माहिती मिळण्याचे तीन मार्ग असल्याचे समजते.

१) **ज्येष्ठ अधिकारी व्यक्ती –** प्रथेनुसार पूर्वी आई किंवा मोठी बहीण घरातील मुलीला लग्नापूर्वी ही माहिती द्यायचे.

२) **साहित्याद्वारे –** हल्ली अशा प्रकारची माहिती मासिके, पुस्तके वाचून मुला-मुलींना होते, अर्थात शालेय अभ्यासक्रमात अजून लैंगिक शिक्षणाचा समावेश न झाल्याची माहितीही गावकऱ्यांना आहे.

३) **धार्मिक अधिकारी व्यक्ती –** देवबागमध्ये गाबितांबरोबर ख्रिश्चन समाजासारखा. इतर समाजाची देखील वस्ती आहे. या ख्रिश्चनांमध्ये 'लिटेरिक' नावाचा एक विशेष समारंभ लग्नापूर्वी केला जातो. याप्रसंगी धर्मगुरु (Priest) लवकरच लग्न होऊ घातलेल्या जोडप्याला गर्भधारणा, गर्भारपण इ. विषयी माहिती देतात. हा कार्यक्रम सावंतवाडीच्या चर्चमध्ये होते. ख्रिश्चन तरुण – तरुणी त्यामुळे गर्भधारणेकडे जीवशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहतात.

याशिवाय गावातील परिचारिकेने दिलेल्या माहितीनुसार अशा प्रकारच्या लैंगिक शिक्षणात वैद्यकीय सेवा पुरवणाऱ्यांचाही सहभाग असतो. बहुतेक लोकांना गर्भधारणेमागची जीवशास्त्रीय कारणमीमांसाही ठाऊक असते; तरीही रुग्णालयात लग्नापूर्वी दिवस गेले म्हणून गर्भपात करण्यात येणाऱ्या किशोरवयीन मुलीही पहायला मिळतात. अशा मुलींना गर्भधारणेविषयी फारशी माहिती नसते.

देवबागमध्ये गर्भधारणेशी निगडीत कोणताही समारंभ केला जात नाही. या काळात मात्र वेगवेगळ्या श्रध्दा, बंधने इत्यादी पहावयास मिळतात. अशा तऱ्हेने पूर्वीच्या काळात फारशी स्पष्ट असलेली ही संकल्पना सध्याच्या काळात बऱ्यापैकी सुस्पष्ट झाल्याचे आढळते.

**गर्भारपण**

गर्भवती स्त्रीला आपल्याला गर्भ राहिल्याचे साधारणत: तिसऱ्या किंवा चौथ्या महिन्यात जाणवते. गर्भारपण काळात स्त्रीला वेगवेगळे पदार्थ खाण्याची इच्छा होते. याला 'डोहाळे लागणे' म्हणतात आणि ते घरच्यांकडून पूर्ण केले जातात. याचबरोबर अशा स्त्रीवर खाण्यापिण्याची बंधणेही येतात. दुध, नाचणी असे लोह परिपूर्ण असलेले पदार्थ तसेच कोवळं खोबरं, मेथी, खिचडी (भात) लसणाची चटणी असे शक्तीदायी पदार्थ गर्भवती स्त्रीला खायला दिले जातात. तसेच सुईण, परिचारिका यांसारख्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांकडून पालक, शेवगा, जायखळ इ. भाज्या आणि पपई, केळे यासारखी फळे तिला खाण्यास देण्यास सांगतात. अर्थातच गर्भवती स्त्रीने काही पदार्थ बिलकुल खाऊ नये अशी बंधनेही तिच्यावर असतात. पपई, खसखस, खजूर असे उष्ण मानलेले पदार्थ जे रक्तस्त्राव व गर्भपात होण्यास कारणीभूत ठरतात, ते टाकले जातात. तसेच गवार (स्थानिक भाषेत चिटके) कोंबडीचे मांस, काही विशिष्ट मासे, कलिंगड हे पदार्थ खाल्ले जात नाहीत.

अशाप्रकारे गर्भवती महिलेने काय खावे व काय खाऊ नये हे पारंपरिक श्रद्धा समजुतीवर अवलंबून असायचे, देवबागच्या लोकांच्या बाबतीत दिसते. परंतु हल्ली लोक याबाबतीत वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे जास्त प्रमाणात ऐकायला लागले आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे आरोग्याच्या नवनवीन संकल्पना आणि त्याविषयी लोकांमध्ये होत असलेली जागृती या सर्वांच्या मुळाशी आई व तिला होणाऱ्या बाळाचे आरोग्य गर्भारपणात उत्तम कसे राखता येईल हा विचार आहे.

खाण्यापिण्याच्या या बंधनाशिवाय गर्भवती महिलेस काही धार्मिक बंधनेही पाळावयास लागतात. उदा. गर्भवती महिलेला मंदिरात जाण्यास बंदी असते. गर्भारपणात मंदिरात जाणे हे अपवित्र समजतात. कारण हा कालावधी धार्मिक प्रदूषणाचा असतो. त्यालाच स्थानिक भाषेत ''सोयर'' असणे असे म्हणतात. तसेच गर्भवती महिलेला ग्रहणांच्या काळात घराबाहेर पडण्यास मज्जाव असतो. नाहीतर टाळू आत गेलेले बाळ जन्माला येते, अशी समजूत आहे. तसेच गायीच्या मानेला बांधलेला दोरखंड-वेसण (येसण) ओलांडून जाण्यालाही बंधन असते. तसे केले तर वाकड्या मानेचे मूल जन्माला येते असे मानले जाते. शिवाय गर्भवतीने विळीवर भाज्या चिरु नये, ओटी भरु नये, धार्मिक प्रदूषणाच्या काळात विहिरीवरुन पाणी नये, कारण विहीर ही पवित्र समजली जाते, इत्यादी धार्मिक बंधणे काही प्रमाणापर्यंत अंधश्रद्धेवर आधारलेली आहेत असे दिसते. तरीसुद्धा त्यांच्याविषयी शंका न घेता पिढ्यान् पिढ्या ती बंधने पाळली जातात.

सर्वसाधारणपणे गर्भवती मुलीला पहिल्या बांळतपणासाठी तिच्या माहेरी आणले जाते. गर्भारपणाचा हा काळ तिच्यासाठी व तिच्या कुंटुबियांसाठी एक औत्सुक्याचा काळ असतो. या औत्सुक्यापोटी पोटातल्या गर्भाचे लिंगनिदान पारंपरिक पद्धतीचे केले जाते. यासाठी बरेच वेगवेगळे मार्ग आहेत. पूर्वीच्या काळी असे मानले जायचे की गर्भवतीची बेंबी पुढे आली असेल तर मुलगी होईल व ती आत गेली असेल तर मुलगा होईल. शिवाय एखादीने स्वप्नात (कोब्रा) साप पाहिला तर मुलगाच होणार, गर्भवतीला जर आंब्याचे लोणचे खावेसे वाटले तर मुलगा व लिंबाच लोणचे खावसे वाटले तर मुलगी होईल. अशा अनेक गोष्टींवरुन गावातल्या जुन्या-जाणत्या महिला होणाऱ्या बाळाच्या लिंगाबद्दल अंदाज बांधतात. या पद्धती जरी विचित्र वाटत असल्या तरी त्या बहुतांशी महिलांच्या आजवरच्या अनुभवावर आधारलेल्या असतात.

गर्भारपणातील बहुतेक सर्व विधी पाचव्या किंवा सातव्या महिन्यात केले जातात, त्यापैकी सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'डोहाळे जेवण' मुलीच्या आईच्या घरी होते. ह्यावेळी गर्भवतीस फुलांनी सजवले जाते व जे पदार्थ खावेसे वाटतात ते बनवून तिचे डोहाळे पुरविले जातात. त्यानंतर तिला बांळतपण होईपर्यंत मनाई असते. काही तरी पोषक आहाराच्या अभावी गर्भवतीस हे डोहाळे लागतात, अशी तरुण महिलांची याबाबत कल्पना आहे. मुलगा किंवा मुलगी होण्याला फारसे महत्त्व दिले जात नाहीत.

**बाळाचा जन्म**

गर्भारपणातील कळा सुरु झाल्यावर सुईणीला घरी बोलविले जाते. सुईण गर्भवतीचे पोट हाताने तपासून साधारण ती कधी प्रसूत होईल याचा अंदाज सांगते. सुईणीच्या मते प्रसूतीकळा या पायापासून पोटापर्यंत प्रवास करतात. हळद आणि जिऱ्याचे मिश्रण गर्भवतीला कळ येण्यासाठी दिले जाते. या सुईणीला आणखी दोन महिला मदत करतात. एक स्त्री समोरच्या बाजूला तर दुसरी गर्भवतीला आधार देण्यासाठी मागच्या बाजूला (डोक्याच्या दिशेला) असे या दोघींच्या मदतीने सुईण बाळंतपण पार पाडते.

बाळाच्या जन्मानंतर सुईण बाळाच्या चेहऱ्यावर पाणी शिंपडते आणि त्याला रडायला भाग पाडते. बाळ रडलं की 'नॉर्मल' असल्याची खात्री पडते. त्यानंतर आईचे पोट चोळले जाते, त्यामुळे वारेसहित इतर जे स्त्राव असतात ते बाहेर पडतात. नाळही कापली जाते. एक तर ती नाळ घरात पुरली जाते किंवा छोट्याश्या पेटीत ठेवून आयुष्यभर सांभाळली जाते. जर नाळ बाहेर फेकली तर बाळ ''भ्रमिष्ट'' होते अशी समजूत अहे. प्रसूतीनंतर लगेचच बाळाचे पोट साफ व्हावे याकरीता त्याला पाण्यात बांळतशेपा घालून पाजले जाते. पूर्वीच्या काळी सलग तीन दिवस बाळाला केवळ हेच पाणी दिले जायचे; पण आता डॉक्टराच्या आग्रहामुळे अगदी पहिल्या दिवसापासून बाळाला स्तनपान दिले जाते. सुरुवातीचा चीक हा बाळाची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी फार उपयुक्त असते. ह्याची जाणीव महिलांना झाल्याचे आढळते.

अर्थात गावातील सर्व बाळंतपणे हल्ली रुग्णालयातच पार पाडली जातात. कारण लोकांना कळून चुकले आहे की डॉक्टरांच्या देखरेखीखाली झालेली बांळतपणे जास्त सुरक्षित आहेत. शिवाय सर्व सोयी सुविधा सहज उपलब्ध असतात. देवबाग मधील लोक साधारणपणे मालवणच्या डॉ. मोऱ्यांच्या खाजगी रुग्णालयात प्रसूतीसाठी जातात.

**प्रसूतीनंतरची बंधने आणि माता-बाळ संगोपन**

प्रसूतीनंतरचे पहिले बारा दिवस धार्मिकदृष्ट्या प्रदूषित अशुद्ध मानून 'सोयर' पाळले जाते. प्रसूत झालेली महिला तिच्या रक्ताने आणि जन्माच्या वेळेच्या धोकादायक शक्तींनी प्रदुषित / अपवित्र झालेली असते, अशी यामागची समजूत आहे. या काळात बाळाच्या आई-वडिलांनी घरात काहीही करायचे नसते. त्यांनी देवालाही जायचे नसते. त्या महिलेने अन्न शिजवायाचे नसते. एका ख्रिश्चन सुईणीने (Midwife) सांगितल्याप्रमाणे हा काळावधी 'आपद' म्हणून समजला जातो. एवढेच नव्हे तर हा धार्मिक प्रदूषणाचा काळ संपल्यानंतरही या आई झालेल्या महिलेने मुलगा जन्माला आल्यास सहा महिने व मुलगी जन्मली असल्यास तीन महिने मंदिरात जायचे नसते.

बाळाला सुरूवातीचे सहा महिने तेलाचा वापर न करता बेसन व हळद पाण्यात एकत्र करुन मसाज केली जाते. ख्रिश्चन सुईणीचा म्हणण्याप्रमाणे जन्मानंतर मसाजसाठी तीन दिवस अंडे वापरले जाते.

बाळंतपणानंतर आईचीही चांगल्या प्रकारे काळजी 'देवबाग' मध्ये घेतली जाते. भाकरीमध्ये नारळाची पाने मिसळून दिली जातात, त्यामुळे दूध चांगले येते अशी समजूत आहे. त्याबरोबरच मेथीचे दाणे घालून बाळंतीणीला तांदळाचा सांजा दिला जातो. भाकरीमध्ये लसणाची पेस्ट मिसळली की तिचे थंडी-खोकल्यापासून संरक्षण होते असे म्हणतात. पूर्वीच्या दिवसात घरामध्ये बाळ-बाळंतीणसाठी स्वतंत्र खोली असायची; पण हल्ली तशी सोय नसल्याने तात्पुरती स्वतंत्र खोलीची व्यवस्था केली जाते. कंबरेला आधार मिळण्यासाठी कमरेभोवती एक कापड गुंडाळले जाते त्यास 'वेढा' असे म्हणतात. त्याबरोबरच खोबऱ्याच्या तेलाने मॉलीश केली जाते. विस्तावामध्ये ओवा व लसूण घालून त्याची धुरीही तिला देतात. याशिवाय अजून एक वैशिष्ट्यपूर्ण प्रथा म्हणजे बाळंतीणीच्या बेंबीवर व कमरेवर अंड्याचे बलक चोळणे, यामुळे बाळंतपणात शक्तीचा जो त्रास झाला आहे तो भरुन निघतो. अशाप्रकारे बाळ-बाळंतीणीची चांगल्या प्रकारे काळजी घेतली जाते.

### प्रसूतीनंतर केले जाणारे विधी

### पाचवीची पूजा

बाळाच्या जन्माच्या पाचव्या दिवशी संध्याकाळच्या वेळेस पाचवीची पूजा केली जाते. बाळाचे नशीब सटवाई ही देवता लिहिते अशी धारणा असल्याने याप्रसंगी सटवाईची पूजा केली जाते. तिच्याकडून नवजात बाळासाठी आशीर्वाद आणि चांगले नशीब या पूजेद्वारे मागीतले जाते. कुमारिकेला या देवतेचे प्रतिक मानून तिची पूजा करण्याची प्रथा गावामध्ये आहे. प्रत्यक्ष पूजेच्यावेळी एका सुपामध्ये तांदूळ घेऊन त्यावर श्रीफळ ठेवलेला पितळेचा घट ठेवला जातो. घटाच्या भोवती पडकळणीच्या फुलांचा हार बांधला जातो. शेजारच्या घरामध्येही नुकतेच बाळ जन्माला आले असल्यास पाचवीची पूजा वेगवेगळ्या ठिकाणी केली जाते. यामुळे दुष्ट शक्तींपासून बाळाचे रक्षण होते असे मानतात. शेवग्याच्या शेंगा, अंबोळी आणि डाळीचे जेवण पाचवीच्या पूजेला करतात. दुसऱ्या दिवशी सूर्योदयापूर्वी पूजेसाठी वापरलेल्या साहित्याचे पाण्यामध्ये विसर्जन केले जाते, नाहीतर दुष्ट शक्ती बाळाला बाधा आणू शकतील असे मानतात.

### ''वायगुळा''ची संकल्पना

गावातील दोन सुईणींनी वायुगुळाच्या संकल्पनेबद्दल माहिती पुरविली. त्यांच्यामते गर्भाशयामध्ये 'वायगुळ' नावाचा अवयव असतो. पहिला मुलगा असलेल्या महिलेला दुसरी मुलगी झाली किंवा मुलगी असलेली मुलगा झाला तर हा अवयव अस्थिर बनतो आणि त्यामुळे महिलेला पोटात वेदना होतात. हा वायगुळ शरीरामध्ये स्थिर राहण्यासाठी खजुरासारखे उष्ण असलेले पदार्थ बाळंतीणीला खाऊ घातले जातात. त्याचबरोबर लवंगाचा समावेश असलेला तांदळाचा सांजा, नारळ, गूळ, इत्यादी पदार्थ देतात. पाचवीच्या पूजेमध्ये जो दिवा लावला जातो. त्यांच्या पूजणाने हा वायुगुळाचा त्रास कमी होतो असे म्हणतात.

### बारसे

देवबागमध्ये हा बारशाचा विधी जन्मापासून १२ व्या दिवशी केला जातो. केवळ आईच्या उदरी जन्म झाल्याने त्या बालकाचा समाजामध्ये प्रवेश होतो असे नाही. बऱ्याच लोकांना असे वाटते की जोपर्यंत बारसं होत नाही तोपर्यंत आई व मुलाने वेगळं राहावं. बारश्याच्या दिवशी बाळंतणीचे प्रदूषण, अशुद्धता संपल्याचे मानले जाते व त्यासाठी काही विधी पाडले जातात. यावेळी घरातील पाच विवाहित महिला बाळंतीणीला विहिरीवर नेतात. तिला विहिरीला पेढा वाहण्यास व विहिरीभोवती 'गोमुत्र' शिंपडायला सांगतात. आठ प्रकारचे धान्य व हळद अर्पण करतात. विहीर ही अत्यंत पवित्र मानत असल्याने अशा प्रकारच्या पूजा करतात.

या विधीनंतर बाळंतीणीला नवऱ्याच्या घरी/ सासरी आणतात. तिने घरात प्रवेश करण्यापूर्वी घरात सर्वत्र पाणी शिंपडले जाते. आता तिला स्वयंपाक घरात घेऊन येतात आणि तिच्याकडून चूल पेटवून घेतात. याचा अर्थ स्वयंपाक, विहिरीवरुन पाणी आणणे अशी घरातील कामे करण्यास तिला पुन्हा मोकळीक लाभलेली आहे. बहुतेकदा याच दिवशी संध्याकाळी बाळाचं बारसं केले जाते. बाळाचे नाव बाळाची आत्या किंवा मावशी ठेवते. ही नामकरण पद्धत म्हणजे एक प्रकारे त्या त्या नात्याचा केलेला आदरच होय.

गाबितांमध्ये बाराव्या दिवशीच बाळाचे कान टोचतात. या कानातील डुलाला स्थानिक भाषेत कुडी असे म्हणतात. याशिवाय पंचधातुंनी बनवलेले वळे बाळाच्या पायात वयाच्या तिसऱ्या चौथ्या वर्षापर्यंत घालतात. दरवर्षी ते बदलतात. बाळाचे रक्तभिसरण

चांगले व्हावे व हाडांना बळकटी यावी यासाठी वापरले जाते तसेच बाळाच्या कमरेला करगोटा किंवा 'सर्पोली' बांधतात. हा करगोटा म्हणजे काळा दोरा किंवा आर्थिक परीस्थिती चांगली असल्यास 'चांदीची साखळी' कमरेला बांधतात. यामागे अशी समजूत आहे की चार वर्षापर्यंत बाळाची कंबर मोकळी राहू देणे योग्य नाही, तर बाळाची पचनसंस्था व्यवस्थित कार्य करणार नाही. बाळाला वाईट नजर लागू नये म्हणून कमरेला दोऱ्या बरोबर 'वेखंड' ही बांधतात. हा दोरा काळा घेण्याचेही कारण हेच आहे.

'नजर लागणे' यामागेही वेगवेगळ्या समजुती आढळतात उदा. शेजारच्याने बाळाची स्तुती केली तर बाळाला ताप किंवा सर्वांगावर पुरळ उठतात, म्हणून बाळाला अशी कोणाची नजर लागू नये म्हणून बाळाची दृष्ट काढली जाते. त्यासाठी मीठ, मोहरी, तुरटी कधी-कधी मिरच्यांचे तुकडे वापरले जाते. हे सर्व चुलीतील विस्तावावर टाकून दिले जाते. असे करण्याने बाळाला कोणाची नजर लागत नाही, अशी धारणा गाबित समाजामध्ये आढळते.

साधारणत: वयाच्या दुसऱ्या वर्षापासून बाळाला स्तनपान देणे बंद होते. त्यासाठी त्याला 'सब' नावाचे आयुर्वेदिक खाद्य दिले जाते. पूर्वीच्या दिवसांत दोन बाळंतपणात अंतर कमी राहत असल्याने बाळाला स्तनपान देण्याचा काळ हा लवकर संपत असे. साधारणत: एक वर्ष पूर्ण होईपर्यंत त्याला दूध व अन्य पेय पदार्थाशिवाय कोणताही जड पदार्थ दिला जात नसे, कारण एवढ्या लहान वयात बाळाला घास गिळता येणे अशक्य असे. चांगला दिवस व मुहुर्त बाळाचे 'उष्टावळ' केले जातो. 'उष्टावळ' म्हणजे बाळाला पेयपदार्थाबरोबरच अन्य आहार देण्यास सुरुवात करणे होय.

'देवबाग' मध्ये वयाच्या साडेतीन वर्षापासून अंगणवाडीत घातले जाते. तिथे त्यांना कविता, गाणी, मराठी मुळ-अक्षरे इत्यादी शिकवले जाते. गावामध्ये आढळलेली वैशिष्टपूर्ण संस्था म्हणजे 'बाल उपासना' मंडळ होय. बहुतेक सर्व मुले या मंडळात येतात. हा वर्ग गावातील महापुरुष मंदिरात दर रविवारी भरतो. तसेच ४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलेही या वर्गात येतात. या मंडळातील मोठी माणसे मुलांना प्रार्थना श्लोक, स्तोत्र इ. शिकवतात. अशाप्रकारे बलोपासना मंडळाद्वारे धार्मीक विश्वास जागविला जातो. त्यामुळे समाजामध्ये परंपरा, चालीरीती यांची जोपासना होते.

गाबित समाजामध्ये वयाच्या ७ किंवा ५ व्या वर्षी मुलाचे जावळ काढण्याची पद्धत प्रचलित आहे. हा विधी फक्त मुलग्यासाठी असतो, मुलींसाठी नसतो.

**संस्कृतीकरण**

आपण सुरुवातीला पाहिल्याप्रमाणे देवबाग हे तिन्ही बाजुंनी पाण्याने वेढलेले आहे. साहजिकच त्याचा प्रभाव गाबित समाजावर पडलेला आहे. गाबितांची मुले अगदी लहानपणापासून पोहायला लागतात. त्यांना माशाच्या विविध जाती, भरती-ओहोटीचे चक्र इत्यादी समुद्र पर्यावरणविषयक अनेक माहिती ही त्यांचा समुद्राशी असलेला घनिष्ट संबंधच स्पष्ट करतो. बालपणानंतरची पुढची अवस्था म्हणजे किशोरावस्था होय. ही अवस्था दाखविणारे कोणतेही विधी गाबितांच्या मुलामध्ये करीत नाहीत. किशोरवयीन मुलींच्या बाबतीत मात्र देवबागच्या गाबित समाजामध्ये मासिक पाळीशी संबंधित काही विधी पाहायला मिळतात. पूर्वीच्या काळी पाळी आलेल्या महिलेला चार दिवसात आंघोळ करण्यास बंदी असे. हल्लीच्या महिला या दिवसात आंघोळ करतात; परंतु घराबाहेर बसतात. त्यांचे कपडे व भांडी स्वतंत्र ठेवली जातात.

पाळीच्या वेळेचे वेगळे बसणे इतके काटेकोरपणे पाळले जाते की गणपती उत्सवात अशा महिलेला घरात बोलण्यास देखील बंदी असते. तसेच या काळात पिंपळाच्या झाडाखालून जाणे देखील अशुभ मानले जाते. तसेच मंदिरात जाणेही वर्ज्य असते. अशाप्रकारच्या समजुती गाबितांमध्ये प्रचलित आहे.

मुलीला पाळीचा त्रास होणे ही घटना 'न्हानुलीच्या जेवणाने' साजरी केली जाते. याप्रसंगी गोडाचे जेवण करुण मुलीला भरवले जाते. घराच्या रांगोळी काढली जाते व तांदूळ-श्रीफळाने मुलीची ओटीही भरली जाते.

या किशोरावस्थेत मुलगा-मुलगी हा भेद फक्त शारीरिक दृष्ट्या नव्हे तर सामाजिक भूमिकांमधून याचे स्पष्ट दर्शन होते. १५-१६ वर्षांची मुले आपल्या वडिलांबरोबर त्यांच्या पारंपरिक धंद्यासाठी मासेमारी करणे नाव चालविणे, जाळ्याचा उपयोग, मासे पकडण्याचे विविध मार्ग इ. विषयी माहिती दिली जाते व ते आपापल्या रापण संघात जाऊ लागतात.

मुलींच्या बाबतीत बघायचं झालं तर त्या मुली स्वयंपाक करणे, घर स्वच्छ करणे, जवळच्या विहिरी-वरुण पाणी आणणे, धाकट्या भावडांची काळजी घेणे इ. कामे करु लागतात. शिवाय त्या आईबरोबर माणवणाच्या बाजारात मासे विकायलाही जाऊ लागतात.

पूर्वीच्या काळी मुलगी १५-१६ वर्षांची झाली की तिचे लग्न उरकण्यात येत असे; पण आता परिस्थितीत सुधारणा झाल्याचे दिसून येते. मुलीचे शिक्षणासाठी पालक पाठींबा देताना आढळतात. साधारणत: २७-२८ वर्षे वयापर्यंत मुलींची लग्ने होतात. मुलांच्या बाबतीतही अशीच परिस्थिती दिसून येते. कारण गाबितांच्या पारंपरिक व्यवसायातून मासेमारीतून निश्चित स्वरुपाची मासिक प्राप्ती होत नाही. त्यामुळे मुल आर्थिकदृष्ट्या उशीरा स्थिरस्थावर होताना दिसतात.

**लग्न**

लग्न म्हणजे जीवनचक्रातील तिसरा टप्पा गाबितांमध्ये मुला-मुलींना आपला जोडीदार निवडण्याची मुभा असते. तसेच लग्न करविताना पालक मुला-मुलींची पसंती लक्षात घेतात. बहुतेक वेळेला लग्न ठरविताना 'कुलई' म्हणजे मध्यस्थाची मदत घेतली जाते. मुला-मुलींची पत्रिका पाहून किती गुण जुळतात हे पाहिले जाते. पत्रिका जुळत नसेल तर लग्नाच्या दृष्टीने पुढे जात नाहीत.

लग्न जमविण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे देवाला 'प्रसाद चढविणे' किंवा 'कौल लावणे'. गावातल्या महापुरुषाच्या मंदिरात हा विधी केला जातो. त्यानुसार देवाच्या मूर्तीच्या बाजूच्या भिंतीवर तांदळाचे ७ दाणे चिकटवले जातात आणि देवाकडे लग्नासाठी कौल मागितला जातो. उजव्या बाजूचे तांदूळ जमिनीवर पडतो, तर देवाचा कौल मिळाला असे समजतात. जर डाव्या बाजूचे तांदुळ पडले तर अपशकून समजून लग्न मोडले जाते.

मुली शक्यतो गावातल्या गावातच लग्न करण्यास पसंती देताना 'देवबाग' मध्ये प्रेमविवाह करण्याचेही मोठे प्रमाण दिसून आले आहे. हे विवाह स्वजातीय तथा आंतरजातीय आहेत. आंतरजातीय विवाहामध्ये गाबित व भंडारी या दोघांमध्ये साधारणपणे विवाह घडून येतात. सुरुवातीला पालकांचा विरोध असतो पण कालांतराने ते वधु-वरांना स्वीकारतात.

• • •